म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२-३४
१९६५



REFBK-0014475

# जवाहर



पद्माकर कृष्ण सावरकर

# भारतरत्न जवाहर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 38669 दि.
9230 दि.
38669
चीन
90/8/67
51.215
5/9238
द. क्र. 97765
शाखा
REFBK-0014475

लेखक

पद्माकर कृष्ण सावरकर
बी. कॉम. साहित्य विशारद

प्रस्तावना

बाळासाहेब चौधरी
–शिक्षणमंत्री, (महाराष्ट्र राज्य)

पद्माकर प्रकाशन
नासिक · मुंबई

मूल्य : दोन रुपये

प्रकाशक :

श्री गणेश प मोकाशी, बी ए

पद्माकर प्रकाशन
५३२, रविवार पेठ,
नाशिक

प्रथमावृत्ति

जवाहर स्मृतिदिन

२७ मे १९६५

सर्व हक्क लेखकाधिन

मुद्रक

अ. द पोतनीस

प्रगति प्रिंटिंग प्रेस,
७९७, विवेकानंद पथ,
नाशिक

प्राप्ति–स्थळ

पद्माकर प्रकाशन
५३२, रविवार पेठ,
नाशिक

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७७१ दि: .....
वर्ग ..... नों. दि. .....

# अर्पण पत्रिका

परमपूज्य तीर्थरुप पिताजी अप्पासाहेब,

आपण मला माझ्या लेखनकार्यातच नव्हे तर प्रत्येक बाबतींत सक्रिय सहकार्य करतां, मार्गदर्शन करता अन् म्हणूनच सदैव मिळणाऱ्या आपल्या सदिच्छामुळें, शुभाशीर्वादामुळें केवळ साहित्य क्षेत्रातीलच नव्हे तर प्रत्येक क्षेत्रांतील माझी पाऊलें स्थिर झाली आहेत व आत्मविश्वासानें मी "पुढची वाटचाल" करीत आहे

—अन् म्हणूनच अल्पावधीत, केवळ सहा महिन्यांच्या अवधींत प्रकाशित होणारी ही माझी तिसरी वाङमय कलाकृति, अत्यंत आदरानें, अभिमानानें आणि विनम्रभावानें आपल्या चरणी अर्पण करतो !

—पद्‌माकर

# प्रस्तावना

शिक्षणमंत्री,
महाराष्ट्र राज्य,
सचिवालय, मुंबई ३२.
७ एप्रिल १९६५.



"भारतरत्न जवाहर" हें श्री. पद्माकर सावरकर यांनी लिहिलेलें चिमुकलें चरित्र मी वाचलें पं. जवाहरलाल नेहरूसारख्या विश्वविख्यात असामान्य महापुरुषाची कथा अवघ्या पाऊणशे पृष्ठात चित्रित करणें अवघड आहे तरीसुद्धां विद्यार्थी वाचकाना पं. नेहरूंच्या जीवनपटाची अंशतः ओळख करून देण्याचे कार्य या चरित्राद्वारें पार पाडण्यांत लेखक यशस्वी झाले आहेत.

पं नेहरूंसारखा नेता युगायुगातून एखादाच निर्माण होतो. आकाशात तळपणाऱ्या चंद्रसूर्याच्या परस्परविरोधी गुणाचा मनोहर संगम पंडितजींच्या व्यक्तिमत्वात झाला होता त्याच्या ज्वलंत आणि प्रखर देशभक्तीमुळें साम्राज्यशाही डळमळली तर त्यांच्या शीतल

व्यक्तिमत्त्वामुळे त्यांनीं आंतरराष्ट्रीय राजकारणांत एखाद्या अनभिषिक्त सम्राटापेक्षाहि अधिक लोकप्रियता मिळविली भारतांतील जनतेच्या हृदयसिंहासनावरची त्यांची मूर्ति पिढ्यान् पिढ्या अविचल राहील राजराजेश्वरानींहि या भाग्याचा हेवा करावा अशी लोकप्रियता त्यांनीं या देशात मिळविली पंडितजी म्हणजे चैतन्याचा मूर्तिमंत अवतार होता. त्यांचा विद्वत्ता, त्यांचे वक्तृत्व, त्यांचे भाषाप्रेम, त्यांची मानवतेवरील व संस्कृतीवरील निष्ठा या सार्‍याच गोष्टी म्हणजे भारताचा अमोल आणि अविस्मरणीय ठेवा आहे त्यामुळें नेहरू चरित्र हें यापुढें पिढ्यान्‌पिढ्या भारतीय कवींना आणि साहित्यिकांना स्फूर्ति देणार आहे

अशा प्रसंगीं श्री. पद्माकर सावरकर यांनीं मोठ्या श्रद्धेनें ही पंडितजींना वाहिलेली श्रद्धांजलि कौतुकास्पद आहे

म. ध. चौधरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ३८५५९ दि:
ग्रंथ ९२-३ ..........

# पुरस्कार

( १ )

श्री. पद्माकर सावरकर यानी मुलासाठी लिहिलेली दोन चरित्र पुस्तके यापूर्वीच प्रकाशित झाली असून कुमार–वाचकांनी त्यांचे उत्साहाने स्वागत केले आहे, आता ते प नेहरूंचे चरित्र सादर करीत आहेत प नेहरू भारताचे केवळ पतप्रधान नव्हते, तर देशाच्या सर्वांगीण प्रगतीला प्रेरणा आणि चालना देणारे ते अेक असाधारण युगनेते होते. अशा थोर भारतनेत्याच्या कर्तब-गारीचा आणि चरित्राचा कुमार आणि तरुण वाचकांना परिचय करून देणारे साहित्य जेवढें पुढे येईल तेवढें हवे आहे. श्री पद्माकर सावरकर यानी ही गरज ध्यानात घेऊन आपल्या पुस्तकाची रचना मोठ्या साक्षेपानें केली आहे नेहरूंच्या चरित्रातील कथात्मक भाग त्यानी सुरसतेनें सांगितला आहे, त्याचप्रमाणें त्यांच्या मोठेपणाचे विवेच-नात्मक दर्शनहि वाचकांना घडविले आहे सोप्या, समर्पक भाषेत लिहिलेला हा पंडितजींचा चरित्रपट कुमार वाचकांना खूप आवडेल असा विश्वास वाटतो

वि. वा शिरवाडकर

( कवि कुसुमाग्रज )

नासिक

१–५–१९६५

किशोर वाचकासाठीं थोराचा सुचरित त्यांना समजेल अशा शैलींत उपलब्ध करून देण्याची नितात आवश्यकता आहे. नैतिक मूल्याची जपणूक आतां कुटुब, शाळा अशा संस्थांतून करवून घेण्यासारखी परिस्थिति अनेक कारणांमुळें दुरापास्त होत चालली आहे एवढेंच नव्हे तर सामाजिक नीतिमूल्यांच्या संदर्भांत वैदग्ध्यता सद्गुणाचा विकास कसा होईल ह्याची विवचना जाणत्या नागरिकास प्रतिदिन गोंधळात टाकीत आहे. अशा वेळीं श्री पद्माकर सावरकर यानीं लिहिलेले "भारतरत्न जवाहर" हे पुस्तक अवलोकनार्थ माझ्या पाहण्यात आलें तेव्हा मनास समाधान झाले लेखकानें मोठ्या संक्षेपानें कै. प. जवाहरलाल नेहरूंच्या जीवनातील ठळक व संस्कारी प्रसगाचें, त्यांच्या स्फूर्तिप्रद विचारांचें, त्यांच्या महान् व्यक्तिमत्वांतील अनेक सद्गुणांचें दिग्दर्शन आपल्या ओघवत्या, प्रासादिक रसाळ पण सोप्या शैलींत केलें आहे जवाहरलालजींचें जनतेवरील प्रेमाचें, त्यांच्यावर जनतेनेंहि केलेल्या अफाट प्रेमाचें, भक्तीचें रहस्य या पुस्तकद्वारें वाचकांच्या अंत करणापर्यंत पोहोंचू शकतें राष्ट्रीय दानत निर्माण करण्यासाठीं त्यागी राष्ट्रपुरुषाच्या अशा महान् आदर्शाचा तेजस्वी, स्फूर्तिदायक जीवनपट नव्या पिढीच्या नजरेखालून गेलाच पाहिजे

श्री पद्माकर सावरकर यांनी अशाप्रकारें आणखीहि चरित्रें लिहून कुमारांसाठीं लिहिल्या जाणाऱ्या चरित्र वाङ्मयात मोलाची भर घालावी अशीच अपेक्षा या पुस्तकानें निर्माण होते

माध्यमिक शाळांच्या वाचनालयासाठीं ह्या पुस्तकाची शिक्षण खात्यानें शिफारस करणें अत्यंत स्वागतार्ह होईल।

१ जानेवारी ६५

श्री म वि गोविलकर

'हिंदी विभाग' प्रमुख प्राध्यापक

ह प्रा ठा महाविद्यालय,

नासिक

नासिक
१५-८-१९६४

तुम्हीं तुमच्या पुस्तकाचें हस्तलिखित आवर्जून वाचावयास देता. त्या वाचनात वेळ चांगला जातो तुमच्या पहिल्या पुस्तकांत तुम्हीं एका थोर समाजसेवकाचें व एका विश्ववद्य कवीचें-अशीं दोन चरित्रे रेखाटली तेव्हाच मनांत विचार डोकावून गेला कीं तुम्हीं "सावरकर" आणि तेहि नासिकचे तेव्हा अजून तुमचे मन एखाद्या महान् देशभक्ताच्या चरित्राकडे कसें वळलें नाहीं ?

पण पडितजीचे चरित्र लिहून तुम्ही तुमचें नांव सार्थ केलेंत या चरित्राचा माझ्या दृष्टीनें विशेष म्हणजे तें छोटें असूनहि सर्वांगीण आहे. कुमाराच्या मनांत प्रथम मातृभूमीविषयींचा अभिमान तुम्हीं जागृत केलात,हेंहि समयोचितच आहे या चरित्रातील नेहरू कुटुबाचा इतिहास, त्याच्या नांवाचा इतिहास, सायमन कमिशन समोरील मोर्चा, नाभा सस्थानांतील अटक तसे काहीं प्रसग कुमारांना निश्चित नवे वाटतील पिता-पुत्र सबधाच्या कांहीं आठवणी आपण प्रार-भीच्या भागात सहजच कथन केल्या आणि नतर निवेदनाच्या ओघांत काहीं आठवणी आल्यानें चरित्रांत रसपूर्णता आली आहे चरित्राचें नाव "भारतरत्न जवाहर" अत्यत बोलकें, यथार्थ वाटतें

चरित्रांतील आपली भाषा यावेळीं तर अधिकच अकृत्रिम झाली आहे हें चरित्र किशोरांना तसेंच सर्व थरातील वाचकांना निश्चितच आवडेल यात शका नाहीं

श्री श्री. शं. सराफ
बी अे (ऑ) बी. अेड्
मराठी विभाग प्रमुख
पेठे विद्यालय, नासिक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७७९ . दि: ....
ओ. क्रि. ....
१२-३८ १०/११/६५

# लेखकाचें हृद्गत

रसिक वाचकहो !

आजच्या संक्रमणाच्या काळांत, आणीबाणीच्या काळांत राष्ट्रीय ऐक्याची नितांत आवश्यकता आहे. उगवत्या पिढीला, किशोर-पिढीला राष्ट्रीय ऐक्याची जाणीव करून देण्यासाठीं, त्यांच्यावर सुसंस्कार करण्यासाठीं, अनादी काळापासून परम पवित्र असलेल्या या मातृभूमींतील--भारतभूमींतील महान् विभूतींचीं, मार्गदर्शक राष्ट्रनायकांचीं, थोर पुरुषोत्तमाचीं आदर्श, तेजस्वी चरित्रें लिहिलीं गेलीं पाहिजेत.

किशोरांसमोर भारतभूमींतील तेजस्वी व्यक्तिरेखा ठेवल्यानें, त्यांच्यावर सुसंस्कार होतील. आदर्श समोर राहतील, बोधप्रद शिकवणूक मिळेल, स्फूर्ति प्राप्त होईल. याच जाणिवेनें "भारतरत्न जवाहर" हें पंडितजींचें चरित्र मी लिहिलें आहे. जनतेच्या या लाडक्या नेत्याचें, महान् युगपुरुषाचें, आदर्श पुरुषोत्तमाचें जीवनचरित्र सर्वांनाच बोधप्रद, स्फूर्तिप्रद ठरणार आहे, मार्गदर्शक ठरणार आहे.


पंडितजींची तेजस्वी व्यक्तिरेखा, याच इच्छेनें मी लिहिली आहे. या कामीं महाराष्ट्राचे लोकप्रिय शिक्षणमंत्री नामदार बाळासाहेब चौधरी यांनीं अत्यंत आपुलकीनें मार्गदर्शन केलें. हस्तलिखित वाचून, प्रस्तावना दिली, 'दैनिक गावकरी' या लोकप्रिय वृत्तपत्राचें संपादक श्री दादासाहेब पोतनीस, श्री धर्माधिकारी, सुप्रसिद्ध चित्रकार श्री पंडितराव सोनवणी, सौ. भावना भार्गवे व अन्य मित्रमंडळींनीं जो सहकाराचा हात पुढें केला त्याबद्दल मी त्यांच्या ऋणी आहे. तसेंच पद्माकर प्रकाशनाचे उत्साही प्रकाशक श्री. ग. प. मोकाशी यांनीं प्रकाशनकार्य अंगिकारलें अन् म्हणूनच पंडितजींच्या पहिल्या स्मृतीदिनीं पंडितजींच्या स्मृतींना उजाळा करून देण्यासाठीं "भारत

रत्न जवाहर" हें चरित्र आपणांसमोर येत आहे. प्रकाशक श्री मोकाशी यांचा मी अत्यंत आभारी आहे.

अवघ्या सहा महिन्याच्या आत 'भारतरत्न जवाहर' हे माझें तिसरे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. भारतभूमींतील सर्वश्रेष्ठ, आदर्श, तेजस्वी विभूतीचा, महान् युगपुरुषाच्या जीवनपट सर्वांना स्फूर्तिदायक, प्रेरणादायक व मार्गदर्शक ठरो.

श्री पद्माकर कृष्ण सावरकर

रविवार पेठ नाशिक.



: अनुक्रमणिका :

# भारतरत्न जवाहर


| | | |
|---|---|---|
| प्रकरण | पहिले | "भारत देश महान् ! |
| ,, | दुसरें | बालपणीचा काळ सुखाचा |
| ,, | तिसरें | विद्येच्या माहेरघरी--इंग्लंडला ! |
| ,, | चवथे | राजकारणाच्या संग्रामात उडी |
| ,, | पाचवे | देशभक्ता प्रासाद बंदिशाला |
| ,, | सहावे | स्वातंत्र्यलढ्याची समाप्ती..... .....अन् पतप्रधानपदी नियुक्ती |
| ,, | सातवे | भारतरत्न जवाहर |
| ,, | आठवे | शांतिदूताचें महाप्रयाण....! |
| ,, | नववे | : विचार दर्शन |
| ,, | दहावे | भारतरत्न जवाहरलालजींचा जीवनपट |


★

ठा स्थव ता.
अनुक्रम .......... वि: ..........



भारतभाग्यविधाते जवाहर

प्रकरण पहिलें

दा. क्र.
शाखा

# भारत देश महान् !

भारतभूमि! माझी प्रिय, प्यारी, वंद्य भारत भूमि! माझ्या प्रिय मातृभूमीचें जन्मभूमीचें नाव घेताक्षणींच मन कस अभिमानान भरून येतं, आनंदान फुलून येतं, पुलकित होत. शरीराच्या रोमारोमात उत्साहाचें, उल्हासाचें वारें खेळूं लागतें. फ़ार प्राचीन काळापासून अलम् दुनियेंत कीर्तिपताका फडकवणारी, सुवर्णभूमि म्हणून नांवलौकिक प्राप्त करून घेतलेली, वैभवशाली, परमपवित्र भारतभूमि आमची मातृभूमि आहे, जन्मभूमि आहे. किती किती भाग्यवान् आहोंत आम्ही! किती नशीबवान आहोंत आम्ही. ज्यानें गतजन्मांत पुण्य संपादन केलें आहे तोच या भारत-भूमींत जन्म घेऊ शकतो असा एक समज आहे. संस्कृतांत अशी एक म्हण आहे कीं "दुर्लभम् भारते जन्म!" अशा या थोर भूमींत आम्ही जन्मास आलों ही खरोखरच अत्यंत भाग्याची गोष्ट आहे.

याच भारतभूमींत वेद, उपनिषदे, पुराण यांचा अत्यंत पवित्र, निर्मळ झरा झुळझुळला. व्यास, वाल्मीकि या महापुरुषांनीं रामायण, महाभारत हे अमर ग्रंथ निर्मिले. कविकुलगुरु, कविश्रेष्ठ कालीदास, भवभूति, दण्डी, भारवी, माघ, हर्ष या विश्वविख्यात कवींची काव्य प्रतिभा येथेच रंगली. त्यानी लिहिलेल्या काव्यरूपी मधुर, प्रासादिक

रसात सारी जनता न्हाली अन् धुंद झाली. अल्पवयात ज्ञानेश्वरीसारखा अद्वितीय, अलौकिक ग्रंथराज लिहिणारे ज्ञानदेव, निवृत्तिनाथ, नामदेव, एकनाथ, कबीर व तुलसीदास आदि संत महात्म्यांनीं सरस भक्तिगीतें लिहून, भावभक्तीचे झरे जनतेच्या अंत.करणांत निर्माण केले.

आमच्या या श्रेष्ठ भारत देशाला ऐतिहासिक परंपरा आहे; कारण जगातील कोणत्याहि देशाचा नसेल इतका प्राचीन इतिहास या भारतभूमीचा आहे. या देशाची संस्कृति देखील किती थोर! आज जीं जीं राष्ट्रे, अग्रेसर, पुढारलेली, प्रगत म्हणून ओळखलीं जातात ना, तीं ज्या वेळीं अप्रगत, मागासलेल्या अवस्थेत होतीं, त्यावेळीं आमचा भारत देश वैभवाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेला होता, विद्या, कला व तत्त्वज्ञान या क्षेत्रात हा देश अग्रेसर होता. साऱ्या दुनियेचें लक्ष या देशाकडे गेल्यास नवल तें काय? गणित, ज्योतिष, खगोल. वैद्यकशास्त्राचें ज्ञान याच देशानें साऱ्या जगास दिलें. तक्षशिला, नालंदा यासारखीं जगप्रसिद्ध विद्येचीं माहेरघरें याच भूमींत होतीं. या विद्यापीठांतून ज्ञान संपादन करावें म्हणून अनेक परकीय विद्वानांचे पाय या भारतभूमीकडे वळले

अनेक उज्ज्वल, तेजस्वी परंपरा, संस्कृति, विविध धर्म अन् नाना स्वभावाचे नानाविध लोक यांचें अपूर्व मिश्रण याच भारतभूमींत आढळेल. हा पुराणप्रसिद्ध देश ऐतिहासिक दृष्टया वा भौगोलिक दृष्टया जितका विख्यात आहे तितकाच या देशात आढळून येणाऱ्या अपूर्व, नयनरम्य, मनोहारी निसर्गासाठीं, सृष्टिसौंदर्यासाठींदेखील प्रसिद्ध आहे निसर्गाचा वरदहस्त या भूमीवर आहे. या भूमीचें रक्षण करणारे हिमालय, सह्याद्रि यासारखे, आकाशाला गवसणी घालणारे अनेक पर्वतराज येथें आहेत रात्रंदिवस सतत खडा जागता पहारा करून ते या भूमीचे संरक्षण करीत आहेत. तीरातीरावर अपूर्व, प्रेक्षणीय वनें, उपवनें, नंदनवनें निर्माण करणाऱ्या अन् भारतीय जनतेला "निर्मल

जीवन" देणाऱ्या, शांततेचा संदेश सांगणाऱ्या, गंगा–गोदावरीप्रमाणें शेंकडों नद्याहि आहेत नानाविध पशु–पक्ष्यांनीं संपन्न असलेलीं, लता, वेली, पुष्पें, वनस्पती यांनीं बहरलेलीं अनेक घनदाट अरण्येंहि याच भूमींत आहेत कमलदलांनीं आच्छादलेलीं कितीतरी रमणीय सरोवरें येथें दृष्टीस पडतात विशेषत काश्मीरमधलें सृष्टिसौंदर्य तर मनाला अतीव संतोष देतें म्हणून तर त्याला नंदनवनाची, पृथ्वीवरील स्वर्गाची उपमा देतात तद्वतच लांबच लांब, दृष्टी ठरूं शकणार नाहीं अशीं सुपीक काळीभोर मैदानें, पठारें अन् खनिज संपत्तीनें परिपूर्ण अशी भूमि आमची भूषणें होत

येथील जीवन हें समृद्ध होतें, सर्वत्र शांतीचें साम्राज्य होतें अन म्हणूनच या समृद्ध जीवनातून [illegible]
आविष्कार झाला ठिकठिकाणीं कलाकुसरीचे नमुने दिसतात. अजिंठा, वेरूळ येथील कलाशिल्प तर केवळ अप्रतिमच होय

एवंच, ही भारतभूमि विविधतेनें, वैचित्र्यानें नटलेली आहे खरोखरच ही भूमि "सुजलाम्, सुफलाम्, मलयजशीतलाम्, सस्य-शामलाम्" अशीच आहे.

प्राचीन काळापासून अखिल दुनियेला ललामभूत, वंद्य असलेल्या या भारतभूमीच्या, मातृभूमीच्या कुशींत किती थोर, पृथ्वीमोलाचे सुपुत्र जन्मले म्हणून सांगूं! ही मातृभूमि अनंत थोर, महान् नर-वीरांची जननी आहे, माता आहे. या मातेचा मान–सन्मान म्हणजे तिचे हे सारे एकाहून एक थोर असे सुपुत्र! या साऱ्या सुपुत्रांनीं, आपापल्या क्षेत्रांत अचाट कर्तृत्व, कर्तबगारी, पराक्रम दाखवून भारत-मातेची कीर्ति त्रिखंडांत पोहोंचविली, कीर्तिगंगेचा प्रवाह सतत वाहत ठेवला. संत ज्ञानेश्वर महाराजांपासून तों अलम् दुनियेला शांतीचा, अहिंसेचा दिव्य संदेश देणाऱ्या महात्माजींपर्यंत, कितीतरी नरशार्दूल याच भूमींत जन्मले ही भारतभू शूरांची वीरांची त्यागी [illegible]

विभूतींची जननी आहे. एका प्रसिद्ध कवीनें तर या मातृभूमीबद्दल गौरवाचे उद्‌गार काढताना खालील काव्यपंक्ती लिहिल्या आहेत

" परंपरा ही शूर वीरांची, नररत्नाची खाण
इथें निपजले राजे, योद्धे, मुत्सद्दी विद्वान !"

भारतमातेच्या कुशींत जन्म घेतलेल्या या थोर, महान् सुपुत्रांत कोणी पराक्रमी, कर्तबगार राजर्षि होते तर कोणी अलौकिक, दिव्य-ज्ञानी महर्षि, ब्रह्मर्षि होते कोणी महान् तत्वज्ञ होते तर कोणी थोर राजनीतिज्ञ होते कोणी संशोधक होते तर कोणास माजसेवक ... समाजसुधा... तर कोणी, अशिक्षित अबला महिलांचे उद्धारक होते

प्रभु रामचंद्राच्या, भगवान् श्रीकृष्णाच्या वास्तव्यानें पुनीत झालेल्या ... भूमींत मुत्सद्दी, राजकारणी, सत्यवचनी, दानशूर, खंदे सेनानी, पराक्रमशाली, धर्मसंस्थापक, पंडित, विद्वान्, कवि, श्रेष्ठ नाटककार होऊन गेले अन् त्यांची ही परंपरा अजूनहि चालू आहे. माझ्या या महान् भारतभूमीची ही थोर परंपरा पाहिली की नकळत ... जोडले जातात अन मुखातून सहज उद्‌गार ... " ... देश महान् !" या महान देशातील, एकाहून एक ...
विभूतींत भारतीय जनतेचे पंचप्राण, कंठमणि, अत्यंत लाडके, भारत-भाग्यविधाते पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा अग्रक्रम लागेल यांत बिलकूल संदेह नाहीं. शांतिदूत पंडितजींनी आपलें सारें आयुष्य सेवाभावी, निरलस, त्यागीवृत्तीनें, भारतभूचा व भारतीय जनतेचा उद्धार व्हावा म्हणून वेंचलें ! भारतीयांचें कल्याण व्हावें अन् ही महान परंपरा असलेली भारतभूमि पुन्हा सुवर्णभूमि ठरावी, तिचें गतवैभव तिला परत मिळावें म्हणून पंडितजींनीं जीवाचें अक्षरश: रान केलें.

त्याचें हें अलौकिक कार्य चालू असतांनाच कठोर काळाची कुऱ्हाड या भूमीवर कोसळली ! क्रूर, निर्घृण काळानें डाव साधला. नियतीनें खेळ केला

२७ मे १९६४. भारतीय इतिहासातील, जीवनांतील एक अमगल, दुर्दिन ! भारतीय जनतेलाच नव्हे तर अखिल विश्वातील जनतेला दु:खसागरात लोटून, भारतभूमीचा हा थोर सुपुत्र, अचानक अनतात विलिन झाला सारी दुनिया हळहळली, दु:खमग्न झाली, शोकाकुल, शोकमग्न झाली भारतमातेच्या गळ्यातील दैदीप्यमान् तेजस्वी कंठमणीच जणू गळून पडला . तेजस्वी ताराच जणू निखळून पडला त्यामुळें भारतीय जनतेला झालेल्या दु:खाचें वर्णन करणें केवळ शब्दातीत आहे युद्धपिपासू राष्ट्राच्या युद्धप्रवृत्तीमुळें भेदरलेल्या, भयग्रस्त झालेल्या विश्वातील या जनतेला, आपला प्रिय शातिदूत, शांततेचा घाईक निधन पावल्यानें अतिशय धक्का बसला आहे क्रूर काळानें, ज्यावेळीं पडितजींची आम्हाला अत्यत जरुरी, नितात आवश्यकता होती अशा वेळींच, त्याना आमच्यांतून ओढून नेलें आम्ही सारे पोरके झालों, अनाथ झालों ! पण घाबरून, भेदरून चालणार नाहीं प्राप्त परिस्थितीला धैर्यानें तोंड देणें भागच, आहे पडितजींनीं जो मार्ग दाखविला त्याच मार्गानें जाऊन आपण आपला, आपल्या देशाचा विकास केला पाहिजे आपल्या सोबतीला, मार्गदर्शक म्हणून त्यांच्या असंख्य ‘स्मृति’ आहेतच ! होय, फक्त आतां स्मृतीच ! केवळ स्मृति !!

त्या थोर शांतिदूताचें, भारतभूषणाचें, भारतरत्नाचें, बालकाच्या, अत्यत प्रिय चाचाजींचे जीवनदर्शन मी तुम्हाला घडविणार आहे. पंडितजींच्या तेजस्वी जीवनचरित्रापासून आपण प्रत्येकानें बोध घेतला पाहिजे, स्फूर्ति घेतली पाहिजे. त्यांचें आदर्श, स्फूर्तिदायक, बोधप्रद जीवनचरित्र आपण सतत डोळ्यासमोर ठेवलें पाहिजे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७७१ वि: चरित्र
क्रमांक १२-३ नों दि ११/८/७५



हास्यमूर्ति जवाहर !

प्रकरण दुसरें

# बालपणींचा काळ सुखाचा !

विविधतेनें, वैचित्र्यानें नटलेल्या या भारतवर्षांत अनेक पवित्र तीर्थक्षेत्रें आहेत. भारतातील असंख्य भाविक लोक दरवर्षी या तीर्थस्थळांना भेट देतात, त्याची यात्रा करतात, अन् पदरी पुण्य पाडतात. बनारस उर्फ काशी, प्रयाग तथा अलाहाबाद हीं जशीं उत्तरेकडील प्रसिद्ध तीर्थक्षेत्रें आहेत तद्वतच दक्षिण [illegible] नाशिक, पंढरपूर, रामेश्वर हीं तीर्थक्षेत्रें प्रसिद्ध आहेत. प्रयाग तथा अलाहाबाद हें तीर्थक्षेत्र तर त्रिवेणी संगमासाठीं प्रसिद्ध आहे. गंगामाई, यमुना अन् सरस्वती या नद्या येथें एकत्र मिळतात, त्यांचा अपूर्व संगम येथें घडतो. गंगामाईचें शुभ्र, चमकदार, निर्मळ खळखळणारें पाणी अन् यमुनामाईचें श्यामल वर्णाचें परंतु शांत वाहणारें पाणी यांचें [illegible] अन् त्यांना सरस्वती नदी येऊन मिळते. तीनहि नद्या एकमेकींशीं एकरूप होतात अन् पुढें या साऱ्या नद्यांचा मिळून भव्य प्रवाह पुढें वाहत रहातो, जनतेला ऐक्याचा संदेश देत देत हा अथांग प्रवाह पुढे जात रहातो! या अपूर्व, मनोहारी संगमामुळें प्रयाग हें तीर्थक्षेत्र भारतीय जनतेच्या अतीव प्रेमाचें, श्रद्धेचें स्थान बनलें आहे. आदराचें, भक्तीचें स्थान बनलें आहे. या तीन नद्यांच्या पवित्र कांठीच भारताची खरीखुरी संस्कृति नांदली. निर्माण झाली, वाढली, पोसली

[illegible] बेत्री तर प्रयागला भाविक श्रद्धावान् जनतेची तुफान गर्दी होते प्रत्येक व्यक्ति त्रिवेणी संगमांत स्नान करण्याची धडपड करते अन् पुण्य मिळविते

प्रयाग तथा अलाहाबादला तर आणखी महत्त्व आहे तें यासाठीं कीं भारतभाग्यविधाते, भारताचे अत्यंत प्रिय पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची तर ही जन्मभूमि ! या परमपवित्र प्रयाग तीर्थक्षेत्रीं जवाहरलालजींचा १४ नोव्हेंबर १८८९ मध्यें जन्म झाला. जवाहरच्या पिताजींचें नाव मोतीलाल अन् आईचें नाव स्वरूपराणी! मोतीलाल नेहरू म्हणजे अलाहाबाद शहरातील बडे प्रस्थ ! बडी असामी ! ! एक अत्यंत यशस्वी वकील म्हणून त्यांनीं अलाहाबाद शहरीं व आजुबाजूच्या आसमंतांत नांवलौकिक मिळविला होता, खूप कीर्ति अन् धनसंपदा मिळविली होती

तसें पाहिला गेले तर नेहरू कुटुम्ब हे काहीं प्रयागचे रहिवासी नव्हेत. मूळचे ते काश्मिरातले ! त्यावेळीं पंडितजींच्या पूर्वजांचे आडनाव कौल होतें, नेहरू नव्हतें या कौल घराण्यांतील मंडळी संस्कृत व [illegible] होते औरंगजेबबादशहाच्या मृत्यूनंतर रिकाम्या झालेल्या दिल्लीच्या तख्तावर फरुखसियर बसला. त्यानें जेव्हा काश्मिरास भेट दिली तेव्हांच तेथील कौल घराण्यातील विद्वानांचीहि भेट घेतली व त्यांना 'दिल्लीस' यावें, अशी विनंति केली अर्थात्च नाव कमाविण्यासाठीं, बादशहाच्या विनंतीवरून कौल घराणें हें दिल्ली शहरीं वास्तव्यासाठीं आलें तेव्हापासून त्यांना राजवाड्यात संबोधण्यांत येऊं लागलें व पुढे तर हें नांव [illegible] 'नेहरू' म्हणून प्रसिद्धीस आलें कारण त्यांना जी जहागिरी मिळाली होती ती एका कालव्याच्या कांठी होता नहर म्हणजे कालवा. या कालव्याकाठीं जे वास्तव्य करीत ते नेहरू ! असा हा त्यांच्या आडनावाचा मनोरंजक इतिहास आहे

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात नेहरू कुटुम्बास दिल्लीहून आपला गाशा गुंडाळावा लागला अन् हें कुटुंब अखेर प्रयाग या तीर्थक्षेत्रीं आलें अन् तेथेंच स्थायिक झाले. या तीर्थक्षेत्री या नेहरू घराण्याचा चांगलाच उत्कर्ष होत गेला, भरभराट झाली अन् चांगला जम देखील बसला. मोतीलालजींचे वडील बन्धू नंदलाल नेहरू हे अलाहाबाद हायकोर्टात पहिल्या दर्जाचे वकील होते. त्याना चांगला मानमरातब होता. आपल्या वडील बंधूप्रमाणेंच आपणहि वकील व्हावे व नांव कमवावें असं जवाहरलालच्या पिताजींना म्हणजे मोतीलालजींना वाटू लागलें त्यांनीं निर्धार केला, निश्चय ठरविला अन् वडील बंधू नंदलाल यांच्या मार्गदर्शनाखालीं, देखरेखीखालीं वकीलकीचा अभ्यास सुरू केला व वकीलकीची परीक्षाहि दिली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे बसलेल्या सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांत मोतीलाल प्रथम आले व त्यांना 'सुवर्णपदकहि' मिळालें आपल्या वडील बन्धूप्रमाणेंच, पंडित मोतीलालजींनीं, अगदीं थोड्या काळांत अलाहाबाद हायकोर्टात चांगलेंच नांव कमाविलें हुशार 'कायदेपंडित' म्हणून त्यांना कीर्ति मिळाली त्यांचा नांव लौकिक, सुवासिक फुलातील सुवासाप्रमाणें सर्वत्र दरवळू लागला खरोखरच मोतीलालजी महत्त्वाकांक्षी हुषार, जिद्दी तरुण वकील होते मोतीलाल नेहरूंच्या पत्नीचें नांव स्वरूपराणी! खरोखर नावाप्रमाणेंच त्या रूपवान् होत्या या सुविद्य, वैभवसपन्न दाम्पत्याच्या पोटीं अन् नेहरू कुटुबांत, जवाहर जन्मले

पहिलेंच अपत्य, त्यातून पुत्रप्राप्ती! घरात 'लक्ष्मी अन् सरस्वती' यांचा संगम झालेला त्यामुळें जवाहरलालचे घरीं किती लाड होत असतील याची कल्पनाच केलेली बरी छोट्या जवाहरलालचें बालपण मोठ्या आनंदात, मजेत जात होतें उपभोग घेण्यासाठीं राजऐश्वर्य, गोड कौतुक करण्यासाठीं माताजी अन् पिताजी उत्सुक, तयार होतेच! जवाहरची सेवा करण्यासाठीं, काळजी घेण्यासाठीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम . ३८७७१ वि: ......
क्रमांक . १२०३८ नों: दि: ......



घरांत कितीतरी नोकर–चाकर, आया–दाया, सदैव हात जोडून उभ्या असत छोटया जवाहरचें पालन–पोषण–संगोपन अगदीं व्यवस्थित व्हावें म्हणून मोतीलालजींनीं खास इंग्रज बाईची नियुक्ती केली होती भरपूर खावें, प्यावें, अन् यथेच्छ हुंदडावें, खेळावें हेंच जवाहरचें काम ! जवाहरला खेळण्यासाठीं कितीतरी साधनें होती, क्रीडाभूमि होती. जवाहरला खेळण्यासाठी, हिंडण्या–फिरण्यासाठी केव्हढा प्रचंड वाडा होता ! वाडा कसचा राजवाडाच होता अगदीं ! "आनंदभवन" होतें नाव त्याचे ! सर्व सुखसोयींनीं युक्त असें हें आनंदभवन मोतीलालजींनीं आपल्या खास देखरेखीखाली तयार केलें त्यातील प्रत्येक दालन हें अद्यावत् साधनानीं परिपूर्ण होतें. खुर्च्या, कपाटे, कोच, पलंग, गाद्यागिरद्या. सारे, सारें काहीं उंची अन् बहुमोल सामान होतें त्यात आनंदभवनाच्या आजूबाजूला फळाफुलानीं, लतावेलींनीं बहरलेली बाग होती नानाविध प्रकारच्या मधुर, सुवासिक पुष्पाचा सुगंध दरवळत असे अन् त्या सुगंधात आनंदभवन न्हाऊन निघे खेळण्यासाठीं खास क्रीडांगणेंसुद्धां तयार केलीं होतीं पोहोण्याची हौस फिटावी अन् आनंद लुटता यावा म्हणून सुंदर तलावहि बांधला होता. एका बाजूला हिमालयाची छोटी प्रतिकृति तयार करण्यांत आली होती त्या हिमालयावर श्रीशंकराच्या सुबक मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. या मूर्तीच्या जटेंतून झुळझुळ् वाहणारी गंगामाईसुद्धा होती अशी ही नितांत रमणीय, अतीव सुंदर जागा होती. कलाकुसरीनें युक्त अशा आनंदभुवनांत जवाहरलालचें बालपण मोठ्या आनंदांत जात होतें

आपल्या बालपणाबद्दल जवाहरलाल म्हणत, "श्रीमंत आई-वडिलाचे एकुलते एक चिरंजीव म्हणून माझे खूपच लाड होत माझ्या वयाच्या अकराव्या वर्षांपर्यंत पाठीवर एकहि भावंड झालें नाहीं. त्यामुळे घरादारांत माझें खूपच कोडकौतुक होई माझ्या दोघी बहिणी माझ्याहून

खूपच लहान आहे. आम्हा तिघा भावंडात खूप वर्षांचें अंतर आहे. अर्थातच बालपणीं मला माझ्या बरोबरीचे सवंगडी मिळाले नाहींत. बाहेरच्या मुलांशीं मी खेळूं नये, संपर्क साधू नये म्हणून सक्त नजर असे.त्यामुळें मी एकलकोंडा,एकाकी स्वभावाचा बनलों निदान शाळे-तल्या वर्गबधूंशीं तरी गट्टी करावी, मैत्री जोडावी तर तेंहि घडलें नाहीं कारण मला शाळेंत कधींच पाठविण्यांत आलें नाहीं.उलट मला घरींच सर्वप्रकारचें शिक्षण देण्यांत आलें व त्यासाठीं खास खाजगी शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली होती या माझ्या एकान्तवासांत मी निरनिराळे बेत आखी, स्वत च्या कल्पनेच्या मनोराज्यांत गुंग होऊन जाई तर एकट्यानें खेळावयाचे खेळ खेळत असे."

जवाहरलालजींच्या शिक्षणाची जबाबदारी ज्या शिक्षकांवर सोंपविण्यात आली होती त्याचें नाव होतें फर्डिनंड ब्रूक्स ! ते 'आयरीश' होते. मोठे तत्त्वज्ञानी होते त्यांच्या उच्च विचारसरणीचा परिणाम जवाहरलालवर झाला. ते मोठे विद्वान शिक्षक होते. इंग्रजी भाषेचा परिचय व त्यातील साहित्य याची ओळख त्यानीं जवाहरलालनां करून दिली निरनिराळीं छोटीं छोटीं, सुंदर इंग्रजी पुस्तकें ते जवाहरला वाचावयास देत काव्याची आवड जवाहरमध्यें निर्माण झाली याला कारण त्याचे शिक्षक ! आनंदभवनांत छोटीं प्रयोगशाळा तयार करण्यात आली होती त्यात जवाहर व त्याचें खाजगी शिक्षक निर-निराळे शास्त्राचे प्रयोग करण्यात वेळ घालवीत असत.याखेरीज जवा-हरला हिंदी व संस्कृत शिकविण्यासाठीं त्या त्या भाषांतले गाढे पंडित येत. याखेरीज जवाहरच्या मातोश्री स्वरूपराणी व काकू, रामायण महाभारतातील अनेक स्फूर्तिदायक कथा जवाहरला सांगत तर घरांतील मुनीमजी अरेबियन नाईटस्मधील मजेदार कथा जवाहरला सांगत व त्याचें मनोरंजन करीत अशा तऱ्हेनें बाल जवाहरवर सुसंस्कार होत होते

जवाहरलालच्या बालपणातील काहीं आठवणीं सांगण्यासारख्या आहेत

मोतीलाल नेहरू हे अलाहाबादमधील एक यशस्वी वकील होते त्यानीं चांगलें नांवहि कमाविलें होतें अर्थात् त्याचा मित्रपरिवारहि खूप मोठा होता.दररोज सायकाळीं ही मडळी येत अन् मग सर्वांचा वेळ गप्पा मारण्यांत, हंसण्याखिदळण्यात वा खेळण्यात जाई एक दिवस मोतीलालजी व त्यांचे सारे मित्र कोणतेंतरी लाल रगाचें पेय पीत होते. छोटया जवाहरनें हें पाहिलें अन् तडक धावत धावत तो आईजवळ गेला अन् बाबाबद्दल त्यानें तक्रार केली व सांगीतलें, " आई, बाबा बघ ना तें 'लाल लाल' काय पीत आहेत ग् ! मला तर त्याची फार भीति वाटते ! ! तू साग ना काहींतरी त्यांना. "

आईनें जवाहरलालला कुशीत घेतलें. कुरवाळलें व त्याची समजूत घातली, " बाळा, तें लाल रगाचें मद्य आहे ! ! "


एकदा जवाहरनें पिताजींच्या टेबलावर दोन फाऊंटनपेन पड-लेलीं पाहिलीं जवाहरनें विचार केला, बाबाना एकाच वेळीं दोन पेन लागणार नाहींत अर्थात् जवाहरनें त्या पेनपैकीं एक पेन पळविलें थोडयाच वेळात गहाळ, हरविलेल्या पेनबद्दल विचारणा चालली आहे व कसून शोध घेतला जात आहे हें जवाहरच्या ध्यानांत आले. जवा-हरलालला पेनबद्दल विचारण्यांत आलें. पण तो नाकबूल झाला १-२ दिवसानीं पेनचा शोध लागला. अन् जवाहरचा गुन्हा उघडकीला आला. वडील अत्यंत संतापले आणि त्यानीं जवाहरलालला या चोरीबद्दल खरपूस चोप दिला.जवाहरला आपल्या पिताजीबद्दल खूप आदर व प्रेम वाटत होतें त्यात आतां भीतीचा अंशहि आला व ते पिताजींना घाबरू लागले

असेच एकदा जवाहरचे पिताजी मित्रमडळीबरोबर आनदभवनाच्या क्रीडांगणावर टेनिस खेळत होते जवाहरलालला घोडदौडीचा खूपच

नाद होता. हा त्याचा आवडता छंद होता म्हणा ना ! लहानग्या जवाहरनें अरबी जातीचा सुंदर अबलख घोडा बाहेर काढला अन् एक उडी मारून त्यावर भरकन माड ठोकली. क्षणार्धांत घोडा दौड करीत निघून गेला. हें साऱ्या मंडळींनींहि पाहिलें. . .थोडया वेळांत तो अबलख घोडा परत आला. पण त्याच्यावर छोटा स्वार नव्हता खोगीर अगदीं रिकामें होतें ! मग मात्र एकच गडबड उडाली. सारी मडळी घाबरून गेली, भेदरून गेली. सर्वांना छोटया जवाहरबद्दल चिंता वाटू लागली काळजी वाटूं लागली अन् सारी मंडळी जवाहरच्य शोधासाठीं बाहेर पडली कारण त्याच्या तोंडचें पाणीच पळाले होते ना ! ही मंडळी बाहेर पडतात न् पडतात तोंच घोडयावरून खाली पडून जखमी झालेला, छोटा स्वार जवाहर लगडत लंगडत परत येत असलेला दिसला. मोतीलालजींनीं आनदानें जवाहरलाला कडेवर उचलून घेतलें या छोटया स्वाराचें मग असें कांहीं कौतुक झालें कीं विचारायची सोयच नाहीं ! असेहि प्रसग खूप घडत तर आनंदाच्या प्रसगानाहि कांहीं वाण नव्हती. निरनिराळे सण येत, उत्सव साजरे केले जात त्यावेळीं जिकडे तिकडे आनदी आनद असे याखेरीज वर्षांतून एकदाच येणारा समारभ म्हणजे छोटया, लहानग्या जवाहरचा वाढदिवस ! प्रत्येक वाढदिवस मोठ्या उत्साहानें, मोठ्या आनदानें साजरा केला जाई. त्या दिवशीं जवाहरची ऐट, मिजास कांहीं विचारूच नका अगदीं सकाळींच जवाहरला मोठ्या तराजूच्या, ताजव्यात बसवित व दुसऱ्या ताजव्यात धान्य व इतर वस्तू घालून वजन करण्यांत येई. या वस्तू गोरगरिबाना वांटून टाकण्यात येत यानंतर जवाहरला सुंदर पोषाख चढवित त्याला खूप खूप बक्षिसें, देणग्या भेट म्हणून मिळत. त्यानतर पचपक्वान्नाची, अत्यत थाटाची मेजवानी होई. असा हा वाढदिवसाचा कार्यक्रम असे. या दिवशीं जवाहरलालचे खूपच लाड होत या वाढदिवसाबद्दल त्याची तक्रार असे ती ही कीं,हा वाढदिवस वर्षांतून

फक्त एकदाच कां येतो ? तो वारवार येत जावा ! सर्वांनीं जमावें खावें, प्यावें, मजा करावी ! !

-- असें हें जवाहरचे बालपण मोठ्या आनंदांत जात होतें सुखात जात होतें बालपणीचा काळ सुखाचा म्हणतात ना तेंच खरें।



क्रिकेटपटू जवाहर



विद्यार्थी जवाहर

प्रकरण तिसरें

# विद्येच्या माहेरघरीं–इंग्लंडला !

आपल्या पुत्राच्या शिक्षणाकडे पंडित मोतीलाल यांचें पूर्ण लक्ष होतें त्याला खूप खूप शिकवावें, मोठें करावें निदान आपल्याप्रमाणें वकील तरी बनवावें वा बडा अधिकारी बनवावे, अशी छोटया जवाहरच्या माता–पिताजींची अत्यंत इच्छा होती जवाहरलाललादेखील असेंच वाटत असे कीं आपण आपल्या पिताजींप्रमाणें मोठें व्हावें, वकील व्हावें अन् नाव कमवावें। जवाहरची ही तर महत्वाकांक्षा होती. एकीकडे मोठें बनावें याबाबत विचारचक्रें तर दुसरीकडे पारतंत्र्यात खितपत पडलेल्या, बंधनात जखडलेल्या, गुलामगिरींत अडकलेल्या भारतभूमीबद्दल सारखे मनात विचार येत. या मातृभूमीला स्वातंत्र्य कसं मिळवून देतां येईल याचा विचार चाले

आपल्या पुत्राला त्या काळात मिळणारें सर्वोत्कृष्ट शिक्षण देऊन आय् सी एस् करावें नाहींतर त्याला जर पसंत असेल तर बॅरीस्टरची पदवी मिळवून वडिलोपार्जित वकिलीचा धंदा त्यानें करावा, त्यात खूप धनसंपदा मिळवावी, धंद्यात यशस्वी व्हावें व आपल्या धनलक्ष्मीचा उपयोग जगांतील नानाविध सुखाचा उपभोग घेण्यासाठीं करावा असें मोतीलालजींना वाटे आणि एकीकडे छोटया जवाहरच्या मनांत

'भारतभू'बद्दल सदैव विचार चालत भारतीय शाळांवर, तेथें देण्यात येणाऱ्या शिक्षणावर मोतीलालजींचा बिलकूल विश्वास नव्हता म्हणूनच तर जवाहरला घरींच सर्व शिक्षण देण्यांत आलें होतें अन् तेंहि खाजगी ! विद्वान् पंडिताकडून !! वयाच्या पंधराव्या वर्षापर्यंत जवाहरनें घरींच शिक्षण घेतलें आता आपल्या पुत्राला विलायतेला पाठवावें अन् उच्च शिक्षणाची संधि त्यास प्राप्त करून द्यावी असं पंडित मोती-लालजींनीं ठरविलें जर त्याला इंग्लंडला, म्हणजे विद्येच्या माहेरघरींच पाठविलें तर शिक्षण सर्वोत्कृष्ट मिळेलच पण नानाविध अनुभव येतील, त्याची दृष्टी व्यापक होईल या कल्पनेनें मोतीलालजींनीं छोट्या जवा-हरला इंग्लंडला पाठविण्याचा निश्चय केला

१९०५ सालच्या मे महिन्यांत नेहरू कुटुंबांतील मंडळी इंग्लंडला जाण्यासाठीं निघाली. त्यांत जवाहर होता, त्याची चिमुकली बहिण स्वरूप होती अन् माताजी, पिताजी होते जवाहर, आपल्या घरापासून हजारों मैल दूर असलेल्या आंग्लंड देशांत निघाला त्यावेळीं त्याचें वय फक्त १५ वर्षांचें होतें ! जवाहरला इंग्लंडला पोहोंचवून बाकी मंडळी युरोपातील विविध देशांना भेटी देत, भारतात परतली अन् जवाहरचा इंग्लंडमध्यें शालेय अभ्यासक्रम सुरू झाला

हॅरो येथिल प्रसिद्ध माध्यमिक शाळेत जवाहरला प्रवेश मिळाला अन् त्याचें शालेय जीवन सुरू झालें. प्रथमप्रथम घरापासून हजारों मैल दूर असलेल्या परकीय देशात, वेगळ्या वातावरणात रहाणाऱ्या जवा-हरला कसेंसेच वाटू लागलें दूर असलेल्या घराची, प्रिय मंडळींची खूप खूप आठवण होई शरीर जरी परदेशांत असलें तरी त्याचें मन घराकडे धाव घेई.आपल्या मनानें तो केव्हाच अलाहाबाद येथील आपल्या प्रिय वास्तूमध्यें अन् मंडळींत पोहोचे ! हें सारें सोडून आपण घरी जावें असेंहि विचार जवाहरच्या मनात येत एकाकी जवाहर घरच्या मंडळींची आठवण काढून खिन्न होई, उदास होई पण जवाहर महत्त्वा-

काक्षी होता या वेगळ्या वातावरणाशीं एकरूप होण्याचें, समरस होण्याचें त्यानें ठरविलें हळू हळू शालेय जीवनांत तो समरस होऊं लागला

जवाहर हा सुसंस्कृत व व्यासंगी होता हुशार होता. त्याचें सामान्य ज्ञानहि चांगलें होतें हुशार विद्यार्थी म्हणून जवाहरनें नाव कमाविण्यास सुरुवात केली शालेय अभ्यास, लेखन व इतर वाचन यांमध्यें जवाहरचा वेळ जाऊं लागला वाचनाचा व्यासंगहि दांडगा असल्यानें जवाहरला राजकारणाची गोडी वाटू लागली. निरनिराळ्या वृत्तपत्रांतील राजकीय वृत्तें, निरनिराळ्या चळवळींच्या बातम्या वाचून तो स्वतःची हौस फिटवून घेई याखेरीज विमानविद्येबद्दल जवाहरला अत्यंत आकर्षण वाटे. नुकताच विमानांचा शोध लागला होता अन् साऱ्या जगाचें या आश्चर्यकारक वाहतूक–साधनाकडे लक्ष लागलें होतें जवाहरला या नवीन, वेगवान् साधनाचें आकर्षण वाटल्यावांचून कसे राहील ? आपल्या पत्रांतून या विमान–शोधाबद्दल, पिताजींना लिहीत असतांना जवाहर म्हणतो, " या विमानाच्या शोधांमुळें दर आठवड्याला मला माझ्या मातृभूमीकडे येतां येईल व घरच्या प्रिय मंडळींची गांठभेट घेतां येईल याचा आनंद वाटतो "

हॅरो येथील शालेय जीवनाशीं समरस झाल्यानें तेथील वातावरण जवाहरच्या पूर्णपणें अंगवळणीं पडलें मात्र भारतांतील विविध चळवळींविषयींच्या बातम्या वाचून जवाहरच्या मनात खळबळ माजे. पारतंत्र्याची अत्यंत चीड येई. विचारचक्रें सुरू होत. या पारतंत्र्याविरुद्ध जे जे शौर्याचीं कृत्यें करीत, शर्थीची झुंज देऊन स्वातंत्र्यलढे देत, त्यांच्या बातम्या वाचून जवाहरलालला खूप आनंद होई व त्याचें अंतः-करण अभिमानानें व आदरानें भरून जाई

जवाहर महत्वाकांक्षी होता कोणत्याहि परिस्थितीत आपण इंग्लंड-मधून मायभूमीस परत जातांना पदवी घेऊन जायचें, बॅरीस्टर बनूनच

माघारी परतायचें, असा जवाहरचा निश्चय, निर्धार होता.महत्त्वाकांक्षी जवाहरलालची ही महत्त्वाकांक्षा होती.शाळेतील चांगल्या अभ्यासाबद्दल जवाहरला अनेक वेळा बक्षिसें मिळाली एका बक्षिस समारंभांत जवाहरला गॅरीबॉल्डी या थोर देशभक्ताचें चरित्र, पुस्तक म्हणून बक्षिस मिळालें गॅरीबॉल्डीचें आदर्श जीवनदर्शन त्यात चित्रित केलें होतें जवाहरलालला तें चरित्र खूप खूप आवडलें इटली देश स्वतंत्र व्हावा म्हणून गॅरीबॉल्डीच्या नेतृत्वाखालीं अनेकवेळा स्वातंत्र्यलढे झाले. गॅरीबॉल्डी उत्कृष्ठ लढवय्या, सेनानी होता गॅरीबॉल्डीच्या जीवनचरित्रांत जवाहर अगदीं गुंगून गेलें गॅरीबॉल्डीच्या जीवनावर इतरांनीं लिहिलेली पुस्तकें त्यानी विकत घेतलीं व वाचून काढलीं त्यामुळें मातृभूमीबद्दल, भारतभूमीबद्दल तर त्यांना खूप प्रेम, जिव्हाळा वाटू लागला

हॅरो येथील त्याचें शालेय जीवन खरोखरच आनंदांत गेले " विविध अनुभव चाखावयास मिळाले, नवीन मित्र मिळाले " असं जवाहर आपल्या हॅरो येथील शालेय जीवनाबद्दल म्हणत हॅरो येथील शालेय जीवन संपलें अन् विश्वविद्यालयीन विद्यार्थी म्हणून व्यापक जीवन ते आतां अनुभवणार होते हॅरो शाळेचा निरोप घेताना वियोगाचे दुःख त्यांना झालें आपल्या मित्रांचा, गुरुजनांचा त्यानीं निरोप घेतला.

केंब्रिज विद्यापीठात उच्च शिक्षण घ्यायचें असं जवाहरलालनें ठरविलें अन् ट्रिनिटी कॉलेजात त्यानीं नाव दाखल केलें कॅम नदीच्या कांठीं असलेल्या या निसर्गसुंदर, रमणीय वातावरणात, जवाहरचें महाविद्यालयीन शिक्षण सुरू झालें. या महाविद्यालयात वाङ्मयचर्चा मंडळ होतें या मंडळात बड्या साहित्यिकांच्या वाङ्मयावर चर्चा करण्यात येत असे जवाहर या वाङ्मयचर्चा मंडळाच्या सभेस जाई नित्शे, बर्नार्ड शॉ, डिकन्स यांच्या साहित्यावर जी चर्चा होई, विचारांची जी देवाणघेवाण होई ती मनःपूर्वक ऐकत असे या चर्चासत्रात जवाहरनें

मराठी ग्रंथ सं. क्र. १०८८०४

भाग घेतला नाही पण श्रोता म्हणून हजर राही. त्यानें चोर्ख कामगिरी बजा-वली याखेरीज केंब्रिजमध्यें राहणाऱ्या हिंदी लोकांचें "मजलीस" नामक मंडळ होतें. याहि मंडळात विविध विषयावर चर्चा, वादविवाद होत हिंदी राज-ेत विशेषत राजकीय विषयावर चर्चा, परिसवाद होत हिंदी राज-कारणावर खूप चर्चा होई यांतहि जवाहरलाल भाग घेत नसत परंतु श्रोता म्हणून प्रत्येक सभेस जात असत अन् चर्चा, विचार, मन पूर्वक ऐकत असत कॉलेजच्या विद्यार्थी सघातर्फे दर आठवड्यास विविध विषयावर वादविवाद सभा होत प्रत्येक विद्यार्थ्यास वादविवादात भाग घ्यावा लागे व बोलावें लागे, भाषण करावें लागे जे बोलत नसत त्यांना प्राचार्य दंड करीत जवाहर वादविवाद सभेस हजर राही पण कधींहि बोलत नसे न बोलता, तो विचार ऐकत असे. भाषण ऐकत असे एक लाजाळू विद्यार्थी होता झाल जवाहर सभाधीटपणा नसल्यानें आपली फटफजिती उडेल असं जवाहरला वाटे अन् म्हणूनच जवाहर कधींहि बोलत नसे फक्त श्रवण करीत असे वादविवादांत भाग न घेतल्यानें जवाहरला अनेकवेळा दंड भरावा लागला मात्र सायकाळी अनेक मित्रासमवेत, शेंगडीचा शेक घेत घेत, जवाहर चर्चा करीत असे मध्यरात्र उटलून जात असे पण या मित्राच्या रंगलेल्या गप्पाना खंड पडत नसे

जवाहरच्या कॉलेजात, अनेक वेळा हिंदी पुढारी येत व भाषणें देत. त्यावेळचे सुप्रसिद्ध हिन्दी नेते बिपीनचद्र पाल, लाला लजपतराय, गोपाळ कृष्ण गोखले यानीं भेट दिली व भाषणें केलीं याहि भाषणांना जवाहर श्रोता म्हणून हजर होताच

ट्रिनीटी कॉलेजात, जवाहरने अर्थशास्त्र, इतिहास, वाङ्मय याचा अभ्यास केला व पदवी परीक्षेसाठी विज्ञानशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूस्तरशास्त्र हे विषय घेतले १९१० साली जवाहर विश्वविद्यालयीन पदवी परीक्षेस बसले अन् त्यात द्वितीय वर्ग मिळवून ते उत्तीर्ण झाले

बी.ए.पदवी तर संपादन केली पण पुढें काय करावें हा विचार मनात घर करुन होता एकदा वाटे आय् सी एस् ला बसावें व बडी सरकारी नोकरी मिळवावी व जीवन सुखात व्यतीत करावें पण या परीक्षेला बसावयाचें म्हणजे अजून चार ते पाच वर्षे त्याना इग्लंडमध्यें राहावें लागलें असते आधीच घरापासून दूर असलेल्या जवाहरला, प्रिय कुटुंबीय मंडळीपासून सात वर्षांपेक्षांहि अधिक काळ दूर राहावें लागलें व वियोग सहन करावा लागला आणखी चारपाच वर्षे तशाच अवस्थेत काढा-वयाची म्हणजे आणखी कठीण ! शिवाय आय् सी एस् झाल्यावर बडी नोकरी मिळणार, अमलदार बनणार हें सार खरें! पण नोकरी-निमित्त घरापासुन कायमचें दूर जावें लागणार त्याचें काय ? कारण सरकारी नोकरींत केव्हां, कुठे जावें लागेल याचा नेम काय ? शेवटीं वडिलाच्या व स्वत च्या इच्छेनुसार जवाहरनें बॅरिस्टर व्हावयाचें ठरविलें.कायद्याचा अभ्यास करण्यासाठी त्याने केंब्रिजचा दु खी अंत -करणानें निरोप घेतला व "इनर टेंपेल या लंडनमधील संस्थेत पुढील शिक्षणासाठीं पाऊल ठेविलें येथील या दोन वर्षांच्या वास्तव्यात जवाहरलालनें जागरूक राहून, चौकस राहून,जिज्ञासेनें, खूपच ज्ञान संपादिलें वाचनाची हौस फेडली, भागविली खूपखूप वाचन केलें, लेखन केलें वाचन, लेखन, परिभ्रमण व अभ्यास यांतच जवाहरचा वेळ जाई जवाहरने खूप अनुभव अनुभविले आधुनिक जगाचें ज्ञान संपादिलें राजकारण व समाजकारण यांचाहि व्यासंग केला याचवेळीं राजकीय व सार्वजनिक जीवनाची आवड त्याच्यामध्यें निर्माण झाली. इग्लंडमधील व इतरत्र चाललेल्या राजकीय चळवळींचा त्यानीं जवळून अभ्यास केला आपणहि आपल्या प्रिय राष्ट्रासाठीं काहींतरी केलें पाहिजे हा निर्धार, निश्चय त्यानीं केला राष्ट्रप्रेमाचे, राष्ट्रभक्तीचें वारे त्याच्या अंगी खेळू लागले याचवेळीं जवाहरलालजींचे पिताजी मोतीलाल हे देखील राजकारणात सक्रीय भाग घेऊ लागले अर्थात

या गोष्टींचा देखील जवाहरवर खूप परिणाम झाला आपणहि राष्ट्रसेवा करावयाची हा त्याचा निर्धार पक्का झाला हिंदी राजकारणाकडे त्याचे लक्ष लागलें महाराष्ट्र–केसरी लोकमान्य टिळक व पंजाबचे सिंह लाला लजपतराय यांच्या वीरगर्जना, घोषणा ऐकून इंग्लंडमध्येंहि जवाहरचें अंतःकरण हेलावून जाई रोमांचित होई आपली सारी बुद्धि, शक्ति व संपत्ति देशाला अर्पण करून, त्यागीवृत्तीनें राष्ट्रसेवेंत जीवन व्यतीत करावयाचें हा त्यांचा निश्चय झाला लंडन येथील दोन वर्षांचा काळ कसा निघून गेला याचा पत्ताच लागला नाहीं बॅरीस्टरची परीक्षा आटोपून जवाहर त्याच्या मित्रमंडळीबरोबर युरोपातील विविध देशांना भेट देण्यासाठीं रवाना झाला निरनिराळे देश पाहून जवाहरनें खूप ज्ञान व अनुभव संपादन केले

पण नॉर्वे या देशाचा दौरा करीत असताना जवाहरलालजींच्या जीवावर बेतली होती पण तुमच्या आमच्या भाग्यामुळें, सुदैवामुळें, जवाहर त्यांतून वाचले!

नॉर्वेतील डोंगराळ भाग पायानीं तुडवून ही दमलेली भागलेली मित्रमंडळी विश्रांतीसाठीं एका छोट्या खानावळींत आली या खानावळीपासून थोड्या अंतरावर एक सुंदर धबधबा होता. निसर्गरमणीय ठिकाण म्हणून तें प्रसिद्ध होतें. स्नान वगैरे करून धबधबा पहावयास जावें असें जवाहर व त्याच्या मित्रांनीं ठरविलें. त्या खानावळीच्या मालकाला स्नानासाठीं गरम पाणी द्या म्हणून त्यांनीं सांगितलें तर मालकानें ओढ्याकडे बोट दाखविलें व तेथे आंघोळ करा असं सांगितलें. नाईलाजास्तव सारी थकलेली मित्रमंडळी स्नानासाठीं त्या ओढ्यावर गेली अगदीं थंडगार, बर्फाप्रमाणें पाणी! सारं शरीर बधीर होऊन गेलें थकलेल्या जवाहरचे हाल तर विचारूच नका. एका घसरड्या जागेवरून तो घसरला अन् त्या प्रवाहांत सांपडला त्याचीं सारीं गात्रें अगदीं बधीर होऊन गेलीं पाय देखील कुठे टेकेनात;

अन् प्रवाह तर आपल्याबरोबर जवाहरला वाहून नेऊ लागला. थोड्या अंतरावर हा प्रवाह एका प्रचंड कड्यावरून खालच्या दरींत झेप घेतो हाच तो धबधबा ! जवाहर वेगानें खालीं खालीं जाऊ लागला, प्रवाह त्याना वेगानें नेऊ लागला शेवटीं एका मित्राच्या ध्यानात ही गोष्ट आली व प्रवाहाच्या कांठाकाठानें जाऊन त्यानें जवाहरलालचा पाय पकडला व त्याला बाहेर खेचले अन् म्हणूनच जवाहरलालजी वांचले ! खरोखर त्यांचें नशीब बलवत्तर होतें अन् आपलें भाग्य चांगलें होतें म्हणूनच !

१९१२ मध्यें जवाहरलालजींना बॅरीस्टरची पदवी मिळाली अन् मोठ्या उमेदीनें, उत्साहानें, निश्चित ध्येयानें प्रेरीत झालेले जवाहरलालजी मातृभूमीस, प्रिय भारतदेशाकडे परत निघाले यावेळीं त्यांच्याजवळ उत्तम गुणांचा संग्रह तर होताच पण राष्ट्रप्रेमाची दिव्य ज्योत अंतःकरणांत तेवत होती राष्ट्रासाठीं, प्रिय भारतभूमीसाठीं, आपण कांहींतरी केलें पाहिजे हा निर्धार करून ते भारतात परतले होते !

☆

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८०८१ ... वि:
क्रमांक १२३८ ... नों दि



देशभक्त जवाहर

प्रकरण चवथें

# राजकारणाच्या संग्रामांत उडी !

नानाविध प्रकारचे अनुभव अनुभवून व उच्च शिक्षण घेऊन बॅरिस्टर जवाहरलाल १९१२ मध्यें मायभूमीस परतले. माताजी स्वरूपराणी व पिताजी मोतीलाल यांचा आनंद तर गगनांत मावेना! साहजिकच आहे, एकुलता एक सुपुत्र बॅरिस्टर बनून आला होता ना! मातापित्यांना कृतकृत्य झाल्याचा परम आनंद झाला. जीवनाचें सार्थक झाल्याचा हर्ष झाला. सुमारें सात वर्षांच्या वियोगानंतर जवाहरलाल परत भारतांत आले होते, उच्च विद्याविभूषित होऊन! पूर्वींचा जवाहर आणि आतां पाश्चिमात्य देशांतून आलेला जवाहर, यांत जमीन अस्मानाचा फरक पडला होता. उत्तम, नीटनेटक्या, झकपक, अपटुडेट पोषाखाची आवड, उत्कृष्ट राहणीची उच्च विचारसरणीची सवय त्यांच्या ठायीं निर्माण झाली होती.

इंग्लंडहून आल्यावर, घरच्या वातावरणांत ते अगदीं रममाण झाले. सार्‍या कुटुम्बीय मंडळींशीं समरस झाले. गप्पा, चर्चा, विनोद, खाणें–पिणें–फिरणें यांत मोठ्या मजेंत दिवस जाऊं लागले. जवाहरलालजींच्या पाठच्या दोन भगिनी स्वरूप व कृष्णा! या दोघींना, इंग्लंडहून परत आलेल्या जवाहरबद्दल खूप प्रेम होतें, आदर अभिमान होता. शिवाय मनांत त्याच्याबद्दल भीतीचा अंश देखील होताच. स्वरूप व

कृष्णा या भगिनींच्या अभ्यासाकडे जवाहरलालचें पूर्ण लक्ष होतें आपल्या वडील भावाबद्दल कृष्णा आपल्या आत्मचरित्रात म्हणते, "जवाहर आदर्श वडील भाऊ आहे आम्हा बहिणींपेक्षा तो वयानें इतका मोठा असूनहि त्यानें आमच्यासाठीं कायदे केले नाहींत आमच्याशीं तो सौम्यपणानें, समजूतदारपणे बोले, चर्चा करी आम्हीं चुकलो तर आम्हास चुका दाखवीत असे त्याची मते आमच्यावर तो कधीच लादत नसे जवाहर आम्हांस धीर देतो ज्या ज्या वेळेस मदतीची वा मार्गदर्शनाची आवश्यकता असते त्या वेळीं साहाय्यार्थ तो धावत येतो आमचा तो आधारस्तंभ आहे म्हणून तर जवाहर हा आमचा वंदनीय बडा भाई आहे "

जवाहरलालजींना शिकारीचासुद्धा खूप नाद होता वेळ घालविण्यासाठी जवाहर व त्यांची मित्रमंडळी शिकारीसाठी जंगलांत जात. असेच एक दिवस जवाहरलाल मित्रमंडळींबरोबर शिकारीसाठी घनदाट जंगलात गेले जवाहरलालजींनी आपली बंदूक सज्ज केली व समोरच्या ओढ्याकांठी असलेल्या राईत ते तीक्ष्ण नजरेनें पाहू लागले आवाजाचा कानोसा घेऊ लागले वाघ, चित्ता, लांडगा कोणतेंहि क्रूर, रानटी श्वापद येवो, त्याला पाणी पाजावयाचेंच या निर्धारानें जवाहर उभे होते समोरच्या जाळींत खसखस् वाजले सारे उत्सुक झाले, आतुर झाले जवाहरनें गोळी झाडली पण . ती गोळी हरणाच्या एका कोवळ्या, गोजिरवाण्या पाडसास लागली तें कांहीं क्रूर, रानटी श्वापद नव्हतें. ते लहानसें पाडस वेदनेनें, व्याकुळतेने असहाय्य स्थितीत खालीं कोलमडले जवाहरलाल त्या पाडसाजवळ गेले त्या कोमल, गोजिरवाण्या, लहानग्या पाडसाच्या शरीरातून रक्ताची धार लागली होती. त्याचे छोटेसेच पण 'तेजस्वी टपोरे' डोळे अश्रूनीं डबडबलेले होते. दीनवाण्या मुद्रेनें तें पाडस डोळे इकडे तिकडे फिरवित होतें जवाहरलाल त्या जखमी पाडसास पाहून अत्यंत खिन्न झाले दु खी झाले भावनावश जवाहरलाल गहिवरले ! यापुढें प्राणीहत्या बंद ! शिकार बंद असा त्यानीं निश्चय केला

जवाहरलालजींनीं सात वर्षांहून अधिक काळ इंग्लंडमध्यें घालविला त्यामुळे त्यांच्या स्वभावप्रकृतींत बदल होणें अगदीं साहजिकच होतें या काळात त्यांनीं अध्ययनाबरोबर वाचनहि मनसोक्त केलें वाचन, मनन, चिंतन यात ते गुंगून जात असत निसर्गाच्या सान्निध्यात परिभ्रमण करणें हा तर त्यांचा आवडता छंद होता निसर्गाशीं ते एकरूप होत, समरस होत जवाहरलालजींनीं प्रवासाची हौस फिटविण्यासाठीं कितीतरी देशांचा दौरा केला। त्या देशात भ्रमण करून विविध अनुभव संपादन केले, मोठमोठ्या लोकांशीं ओळखी केल्या नव्या आधुनिक जगाचें ज्ञान प्राप्त करून घेतलें पाश्चिमात्य समाजाचें निरीक्षण केलें, अवलोकन केलें सात वर्षांच्या इंग्लंडमधील वास्तव्यानें जवाहरलालजींना नवीन व्यापक दृष्टि प्राप्त झाली; खूप अनुभव आले नानाविध देशांच्या राजकीय, स्वातंत्र्य–चळवळींचा, त्या चळवळींचे नेतृत्व करणाऱ्या झुंजार नेत्यांचा, स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचा, त्यांनीं सखोल अभ्यास केला ह्या स्वातंत्र्यलढ्याचा, स्वातंत्र्यसंग्रामांचा स्फूर्तिदायक इतिहास वाचत असताना, पारतंत्र्याच्या खाईंत खितपत पडलेल्या परतंत्र भारताची तीव्रतेनें आठवण होऊन त्यांना अतीव दुःख होई पारतंत्र्याचें जोखड झुगारून, स्वातंत्र्यदेवतेची प्रतिष्ठापना भारतभूमींत झाली पाहिजे असं त्यांना मनोमन वाटे आपल्या देशातहि स्वातंत्र्यलढे सुरू झाले हें ऐकून जवाहरलालजींना अत्यंत आनंद झाला आपणदेखील आपल्या प्रिय राष्ट्रासाठीं, प्रिय भारतभूमीसाठी काहींतरी केलें पाहिजे असा निश्चय जवाहरलालजींनीं केला निदान स्वातंत्र्यलढ्यात आघाडीवरील सैनिक म्हणून भाग घेण्याचा निर्धार त्यांनीं मनाशीं केला पारतंत्र्याबद्दल, गुलामगिरीबद्दल त्यांना आत्यंतिक चीड होती हे पारतंत्र्य दूर करण्यासाठीं जे स्वातंत्र्यलढे सुरू झाले त्याबद्दल जवाहरच्या मनात खूप प्रेम, जिव्हाळा, आपुलकी निर्माण झाली या स्वातंत्र्यलढ्यात

जवाहरलालजींचे पिताजी मोतीलाल हेहि भाग घेत. म्हणूनच पिताजीं-बद्दल जवाहरलालला खूप आदर वाटू लागला आपणहि त्यांच्या पावलावर पाऊल टाकून राजकीय चळवळींत सक्रीय भाग घ्यावा असें त्यानीं ठरविलें लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल, लाला लजपत-राय या थोर विभूतींबद्दल जवाहरलालच्या मनात अत्यंत आदर होता त्यांचें अनुकरण करून भारतभूमीला दास्यांतून सोडविण्याचे प्रयत्न आपण केले पाहिजेत अशी मनाशीं खूणगांठ बाधून ते भारताला, प्रिय मातृभूमीला परतले होते

प्रथम प्रथम बॅरिस्टर जवाहरलालनी अलाहाबाद हायकोर्टात वकिलकीस सुरुवात केली पण त्यांच्यासारख्या थोर राजकारणी विभूतींचें लक्ष ह्या रुक्ष वातावरणात रमण्यासारखें नव्हतें कोर्टातील ठराविक वातावरणांतील वकील मडळीच्या ठराविक गप्पा, त्याच चर्चा यापायीं या व्यवसायाबद्दलचा उत्साह त्यांच्या मनातून पार गेला या वकिलीच्या पेशात कांहीं राम नाहीं, काही अर्थ नाहीं अस त्याना वाटू लागलें पारतंत्र्यातील भारतमाता, मुक्ततेसाठीं तिच्या सुपुत्रांना आर्त स्वरानें साद घालीत होती, हांक मारीत होती, बोलावत होती भारतमातेचें हें आवाहन जवाहरलालनी स्वीकारलें अन् मातृभूमीला दास्यशृंखलेंतून मुक्त करण्याच्या निर्धाराने, निर्भयतेने राजकारणात उडी ठोकली विलायतेंतील वास्तव्यामुळें, अभ्यासामुळें त्याना नवीन व्यापक अशी दृष्टि मिळाली होती अर्थात्च राजकारणांत पडण्याच्या निर्धारानें त्यानीं कोर्टाला रामराम ठोकला, वकिली व्यवसायावर बहि-ष्कार घातला अन् निधड्या छातीने राजकीय चळवळीच्या समरांगणात त्यानीं बेधडक उडी घेतली सुरुवातीस कॉंग्रेसचें कार्य करणें, कॉंग्रेसच्या ध्येयधोरणाचा प्रसार व कॉंग्रेसचा सदेश जनतेंत पोहोंचविण्याचें कार्य त्यानीं आरंभिले 'होमरूल' सस्थेच्या कार्यक्रमांतहि प्रतिनिधि या नात्यानें त्यानीं कार्यास सुरुवात केली कॉंग्रेसच्या अधिवेशनास सभासद म्हणून ते हजर राहू लागले

काश्मिरमध्यें भ्रमण करीत असताना जवाहरलालजींची एका अत्यंत सुंदर, लावण्यवती, सुस्वरूप तरुण स्त्रीशीं ओळख झाली तिचें नाव होतें कमला कौल। ओळखीचें स्नेहात रूपांतर झालें अन् एक दिवस स्नेहाचें विवाहांत रूपांतर झालें जवाहरलालजींनीं खरोखरच मनासारखी सहचारिणी मिळाली मोतीलालजी व स्वरूप-राणी नेहरू यांचा एकुलता एक लाडका सुपुत्र म्हणजे जवाहर। जवाहरच्या विवाहसोहळयाचा थाटमाट तर विचारूच नका जीवनांत एकदाच येणारा हा सोहळा अत्यंत उत्साहांत, अपूर्व आनंदात पार पाडण्यांत आला रूपवान्, विद्याविभूषित व गुणसंपन्न सुपुत्रास कमलासारखी कोमल, सुस्वरूप, प्रेमळ अन् उदार पत्नी मिळाली. . .

१९१६ मधील फेब्रुवारी महिना अन् त्यातून वसंताचें आगमन सूचित करणारा वसंतपंचमीचा मंगल मुहूर्त ठरविण्यात आला होता लग्नाप्रीत्यर्थ आनंदभवनात कोण जोरात तयारी चालू होती। हा विवाहोत्सव अत्यंत थाटात, ऐश्वर्यांत साजरा करावयाचा होता ना म्हणून तर स्वरुपराणींची धाईगर्दी चालली होती अन् जिकडेतिकडे एकच धामधूम। लग्न दिल्ली येथे होणार होतें एक दिवस सारी वऱ्हाडी मंडळी आपल्या लवाजम्यासह, खास गाडीने अलाहाबादेहून दिल्लीस गेली आणि दिल्ली मुक्कामीं जवाहरलाल नेहरू अन् कमला कौल यांचें अत्यंत थाटामाटांत लग्न झालें. हजारों लोक या लग्नाला आले होते, नूतन दांपत्याला शुभेच्छा देत होते. हा लग्नसोहळा आटोपल्यावर मधुचंद्रासाठीं हें दांपत्य काश्मिरात म्हणजे पृथ्वीवरील महान् नंदनवनाकडे रवाना झालें

याच सुमारास जवाहरलालजींचे पिताजी मोतीलालजी हेदेखील राजकारणात चांगलेच चमकू लागले होते पण त्यांचे राजकारण हें नेमस्तांचें राजकारण होतें, मवाळांचें राजकारण होतें उतारवयात त्यांनीं राजकारणामध्यें भाग घेण्यास सुरुवात केली. आपला व्यवसाय-

करून ते फावल्या वेळात राजकारण करीत मोतीलाल हे कायदे-मंडळाचे सदस्यहि होते आपल्या मागण्या, समस्या, कायदेमंडळाद्वारें सोडवून घ्याव्यात, धीर सौ गंभीर वागावें अशी त्यांचीं नेमस्त मतें होतीं पण जवाहर ताज्या रक्ताचे, तरुण रक्ताचे होते त्यांचीं मतें जहाल होती भारतीय जनतेवर इंग्रज सरकारचा होणारा अनन्वित जुलूम त्यांना सहन होईना भारतीय जनतेवर प्रत्यहीं अन्याय होई, अरेरावी होई. भारतीय जनतेसाठी सर्वस्वाचा होम करून, येथील परकीय सरकारला कोणत्याहि मार्गानें हाकलून लावावे या मताचे जवाहर होते त्यांच्या विचारात जहालपणा होता. अर्थात्‌च मोतीलाल व जवाहरलाल या पितापुत्रांत घरीं खडाजंगी चर्चा चाले वादविवाद होत मग स्वरूपराणी वा धाकटी बहीण त्यांचे हे वाद कसेबसे थांबवीत याच वेळीं दक्षिण आफ्रिकेतील हिंदी जनतेचा प्रश्न सोडविणारें झुंजार लढवय्ये महात्मा गांधी भारतात परतले, आणि राजकारणाला एक नवीन वळण लागले.महात्मा गांधीजींचें युग सुरू झालें महात्मा गांधींच्या प्रभावी व्यक्तिमत्वाने, मोतीलालजी प्रभावित झाले. व आपल्या सर्वस्वाचा त्याग करून राजकारण खेळू लागले त्यांची पूर्वीची नेमस्त मतें बदलली याच वेळी पंजाबमधील जालियनवाला हत्याकांड झालें हे हत्याकांड म्हणजे इंग्रजाच्या अमानुष,राक्षसी वागणुकीची एक झलक होय! प्रतीक होय!! शांतताप्रिय जनता अत्यंत शांततेनें जालियन-वाला बागेंत सभेसाठी जमली होती. या निरपराधी जनतेला बागेंत कोंडण्यात आलें. बाहेर जाणारे सारे मार्ग रोखण्यात आले अन्‌ जनरल डायरनें फौजेला गोळीबाराचा म्हणजे कत्तलीचा हुकूम दिला क्षणा र्धात धाड् धाड् गोळ्या उडू लागल्या व त्या गोळ्यांचें भक्ष्य होऊन लहान तान्हीं मुलें, बालकें, स्त्रिया, पुरुष पटापट् बळीं पडू लागले पण डायरची हौस फिटली नाहीं त्यानें अमाप फैरी झाडल्या भारतीय जनतेवर नाहक सूड घेतला आजहि जालियनवाला बागेंत डायरच्या

कृष्णकृत्याचे, क्रूरकृत्याचे पुरावे जागोजाग आढळतात इंग्रजांच्या या निर्दयी, निर्घृण, अमानष कृत्यानें सारा देश खवळून उठला, पेटला देशाभिमानी व्यक्तींना स्वस्थ बसवेना सारेजण स्वातंत्र्य–चळवळींत सामील झाले याच पार्श्वभूमीवर अमृतसर येथें कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें अन् पंडित मोतीलालजी त्याचे अध्यक्ष होते। स्वातंत्र्या-साठीं कॉंग्रेसला येऊन मिळा असा त्यांनीं सऱ्या भारतीय जनतेला संदेश दिला याचवेळीं जवाहरलालजींनीं स्वातंत्र्य--चळवळीचा संदेश सर्वत्र पसरावा याच हेतूनें वृत्तपत्र काढलें। 'इंडिपेंडंट' हें त्याचें नाव होतें। अशा तऱ्हेनें पितापुत्र पत्रकार बनले

याच वेळीं जवाहरलालजींच्या नेतृत्वाखाली किसान चळवळ सुरू झाली पोटात अन्नाचा कण नाहीं, वापरायला कपडेलत्ते नाहीत, ज्ञानाचा गंध नाहीं अशा हजारों श्रमणाऱ्या गरीब, दीन, भूमिपुत्रावर शेतकऱ्यावर अधिकारी वर्ग जुलूम करीत, त्यांचा छळ करीत, त्यांना मारपीट करीत या गरीब शेतकऱ्यावर कराचा आणि कर्जाचा बोजा होता तो बोजा कमी करण्याचें त्राण शेतकऱ्यांत नव्हतें उलट बोजा दिवसेंदिवस वाढत जात होता जमीनदार माजले होते अन् या किसान कुळाचा मात्र अनन्वित छळ होत होता त्याच्यावर अन्याय होत, अत्याचार होत एक दिवस किसानांचा जथा जवाहरलालजींकडे आला आम्हाला या जुलूमांतून सोडवा असें म्हणू लागला त्यांच्या कहाण्या ऐकून जवाहरलालजींना अतिशय दुःख झालें किसानांच्या मदतीसाठीं, साहाय्यासाठी ते खेड्यात धावलें किसानांच्या ठिक-ठिकाणीं सभा, परिषदा, घेऊन त्यांनीं किसानवर्ग जागृत केला व संघटित केला जवाहरलालच्या नेतृत्वामुळें किसान चळवळीला योग्य वळण लागले व किसानवर्गाला यश आलें प्रांतिक सरकारनें कुळकायद्यात तातडतोब फेरबदल केले हाच जवाहरलाल नेहरूंच्य नेतृत्वाचा विजय होय।

नेहरू 'पितापुत्र' राजकारणाच्या आघाडीवर तेजानें चमकू लागले. साऱ्या देशाचें लक्ष या अद्वितीय जोडीकडे लागून राहिलें होतें. महात्मा गांधी, पंडित मोतीलालजी व जवाहरलाल हे तर भारताच्या राजकीय चळवळींतील प्रसिद्ध त्रिमूर्ति बनले.

याच वेळीं लोकमान्य टिळकांचें देहावसान झालें. टिळक युग संपलें अन् महात्मा गांधी युग सुरू झालें. लोकमान्य टिळकांच्या पार्थिव देहाला अभिवादन करण्यासाठी त्या थोर महापुरुषाच्या, महाराष्ट्राच्या नरशार्दूलाच्या, महान् पत्रकाराच्या, स्वातंत्र्यहक्काची जनतेला प्रेरणा देणाऱ्या प्रेरक शक्तीच्या अंत्यदर्शनासाठीं जवाहरलाल व महात्मा गांधी हें मुंबईस आले! त्याच दिवशीं स्वातंत्र्यसंग्रामाचें नवीन पर्व सुरू झालें!!

☆



वक्ता दशसहस्रेषु . . . . !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........

प्रकरण पांचवें

# देशभक्ता प्रासाद बंदिशाला !

महात्मा गांधी म्हणजे खरोखरच अलौकिक महान् विभूति होय. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांत त्यांनीं प्रवेश केला त्यामुळें स्वातंत्र्यसंग्रामाला, चळवळीला तेज चढलें ! धार चढली बापुजींच्या कुशल नेतृत्वामुळे अन व्यक्तिमत्त्वामुळें नेहरू पितापुत्राच्या जीवनात क्रांति झाली. आपल्या सर्वस्वाचा होम करून या त्यागी जोडीनें भारतभूला पारतंत्र्याच्या पाशांतून मुक्त करण्यासाठी राजकारणात बेडरपणे, निर्भयतेनें उड्या ठोकल्या. दोघेहि जाज्वल्य देशाभिमानी होते ! थोर देशभक्त होते ! ! ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध 'ब्र' काढणें ज्यावेळीं अत्यंत कठीण होतें, त्यावेळीं त्या सत्तेविरुद्ध चळवळीचें, स्वातंत्र्यलढ्याचें रणशिंग फुंकण्याचें महान् कार्य जवाहरलालजींनीं केलें या कार्यांत त्यांना अनेक वेळा कारावास पत्करावा लागला

पंजाबमधील हत्याकांडानें तर भारतीय जनतेच्या मनात प्रचंड क्षोभ, असंतोष निर्माण झाला होता ही राज्यसत्ता नाहींशीं झाली तर बरें असं साऱ्या जनतेला मनापासून वाटत होतें. जनताजनार्दन ब्रिटिशावर चिडला होता; पेटला होता कधीं क्रांति होईल याचा नेम नव्हता अशा वेळीं बापूजींनीं ब्रिटिश सत्तेविरुद्ध असहकारितेचें

शिंग फुंकले. कोणत्याहि बाबतींत सरकारला सहकार्य द्यावयाचें नाहीं, प्रत्येक कार्यक्रमावर बहिष्कार घालावयाचा असें ठरविलें. काँग्रेस व सरकार यांत खराखुरा झगडा सुरू झाला. याचवेळीं इंग्लंडचे युवराज भारतभेटीसाठीं आले. त्यांच्या स्वागतसमारंभावर बहिष्कार घालावा, त्यांना काळीं निशाणें दाखवावीं, स्वातंत्र्याच्या घोषणा कराव्यात असा आदेश जवाहरलालजी व बापूजींनीं सर्वांना दिला; आणि खरोखरच युवराजाचें थंडें स्वागत भारतभर झालें. जनतेपैकीं कोणीहि त्यांच्या स्वागतास हजर नसत. साऱ्यांनीं त्यांच्या स्वागतावर पूर्ण बहिष्कार टाकला होता ना! अधिकारी मंडळी अत्यंत चिडली व सर्वत्र अटकेचें सत्र सुरू झालें. जवाहरलालजींबद्दल तर ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मनांत राग होताच. त्यांतून उत्तर प्रदेशांत किसानांचा मेळावा त्यांनीं संघटित केला, किसानांची चळवळ घडवून आणली म्हणून सरकार जवाहरलालवर खूप चिडलें होते. शिवाय युवराजावर बहिष्कार टाकण्याचें कार्य त्यांनीं केलें! जवाहरलालजींना अटक करण्यात आली व लखनौच्या कारागृहांत डांबण्यांत आलें. त्यांना सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यांत आली. जवाहरलालजींचा कारावासाचा हा पहिला अनुभव होता. आपल्याला अटक होणार हें त्यांना पूर्णपणे पटलें होतें! त्याचप्रमाणेंच अनेकांना ठिकठिकाणीं अटक होऊन तुरुंग कैद्यांनीं भरून गेलें होते.

जवाहरलालजींची तुरुंगांतून लवकरच मुक्तता करण्यात आली. कारण त्यांच्यावरचा खटलाच शाबीत होऊं शकला नाहीं. सुटका होताच जवाहरलालजींनीं चळवळीला पुनः सुरुवात केली. "परदेशी मालावर, परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार घाला, स्वदेशी कापड वापरा. परदेशी मालाची होळी करा" असा व्यापारी वर्गांत प्रचार करीत असतांना जवाहरलालजींना पुनः अटक करण्यात आली व लखनौ कारागृहाकडे त्यांची रवानगी करण्यात आली. न्यायाधिशा-

समोर यावेळीं त्यानीं आपलें स्पष्ट मत मांडलें. "तुरुंग हें आमचें पवित्र तीर्थक्षेत्र आहे. मी खरोखरच भाग्यवान् आहे स्वातंत्र्यसंग्रामांत माझ्या प्रिय मातृभूमीची सेवा मला करावयास मिळते म्हणून खूप आनंद होतो आहे " याचवेळीं मोतीलालजी देखील लखनौ तुरुंगांत होते जवाहरलालदेखील पित्याच्या भेटीसाठीं लखनौ तुरुंगात गेले ! पितापुत्राना शिक्षा व दंड फर्मावण्यात आला होता ! या दंडाची वसुली अधिकाऱ्यानीं अत्यंत अयोग्य मार्गानें केली न विचारतां, न पुसतां आनंदभवनांतील मौल्यवान् चीजवस्तू, फर्निचर याची जप्ती करण्यात आली व दंडाची रक्कम जबरदस्तीने, अन्यायानें वसूल करण्यांत आली

सर्व भारतभर असहकाराचें पर्व सुरू झालें सरकारनें त्याला प्रत्युत्तर दिलें तें दंडपशाहीनें ! जनतेवर अन्याय, अत्याचार होऊं लागला. जनताजनार्दनाच्या धार्मिक भावना दुखविण्यांत आल्या. त्यांच्या सभा, संमेलनावर, उत्सवावर, धार्मिक कार्यक्रमावर पूर्ण बंदी घालण्यात आली शिखाचा फार मोठा धार्मिक उत्सव नाभा या पंजाबातील संस्थानात मोठ्या थाटानें पार पडत असे मोठ्या जत्रेचें स्वरूप त्याला येत असे. पण चिडलेल्या सरकारनें या उत्सवास मनाई केली व बंदी घातली त्यामुळें धार्मिक शीख खूप चिडले, संतापले कसेंहि करून उत्सव पार पाडायचाच हा त्याचा निश्चय होता. म्हणून शिखांचे थवेच्या थवे नाभा संस्थानाकडे जाऊं लागले पण सहरद्दीवरच त्यांना अटक होई व त्याची तुरुंगात रवानगी करण्यात येई. हें जथे वाढू लागल्यावर, त्याच्यावर कायदेभंगाच्या नावाखालीं ब्रिटिश सरकार घोडेस्वार घालीत, मारपीट करीत, लाठ्या चालवीत पण शीख हे सारे अत्याचार शांतपणें सहन करीत

याचवेळीं मुक्त झालेल्या जवाहरलालजींनीं नाभा संस्थानांतील परिस्थितीचें अवलोकन, निरीक्षण करण्याच्या हेतूनें दोन सहकाऱ्या-

सह तिकडे प्रयाण केलें. नाभा संस्थानाच्या हद्दीवरच प्रवेशबंदीचा हुकूम त्याचप्रावर बजाविण्यात आला व ताबडतोब कोणतेहि कारण न दाखवितांना त्याना अटक करण्यांत आली व अंधारकोठडींत त्याची रवानगी करण्यात आली. दोनचार दिवसांनंतर तुरुंगाधिकारी आले व जवाहरलालजींना म्हणाले, "नाभा संस्थानात प्रवेश केल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करावी व 'आम्ही संस्थानाची हद्द सोडून जातो' असे लेखी निवेदन द्यावें म्हणजे तुमच्याजवरील खटला काढून टाकण्यांत येईल व तुमची त्वरित सुटका होईल. कोणतेहि कारण न सांगताना अंधारकोठडींत बंदिस्त करून ठेविलें म्हणून चिडलेल्या जवाहरलालजींनी त्या अधिकाऱ्यास ठणकावलें, "दिलगिरी वा माफी मागण्यासारखें आम्ही कांहींहि केले नाहीं. उलट नाभा संस्थानाच्या अधिकारी मंडळींनीं, आम्हांला उगीचच, कारण नसता अटक केली म्हणून आमची माफी मागावी व ती लेखी द्यावी" संतप्त झालेल्या अधिकाऱ्यांनी जवाहरलालजींवर व त्याच्या सहकाऱ्यावर खटला भरला अन् ६ महिन्याची शिक्षा दिली आश्चर्याची गोष्ट म्हणजे शिक्षेच्या दुसऱ्याच दिवशी त्याची मुक्तता करण्यात आली ! वारे नाभा संस्थान अन् वारे वा तेथील अधिकारी ! !

नाभा कारागृहाची हवा खाऊन आल्यावर जवाहरलाल सार्वजनिक कार्यांत पडले हें कार्य करण्यासाठीं त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडली अन् एक दिवस जवाहरलाल नेहरू अलाहाबाद नगरपालिकेचे नगराध्यक्ष बनले. यावेळी भारतातील साऱ्या प्रमुख शहरांतील नगरपालिकांच्या अध्यक्षपदीं थोर कॉंग्रेस नेते चढले कलकत्ता महानगरपालिकेचे महापौर देशबंधु दास झालें तर मुंबईचे महापौर विठ्ठलभाई पटेल, अहमदाबादचे नगराध्यक्ष वल्लभभाई पटेल तर पुण्याचे न चिं केळकर बनले ! आपल्या योग्य कारभारानें, आदर्श सुधारणानीं त्यानीं नगरपालिकांना नांवलौकिक मिळवून दिला. जवाहरलालजींनीं सुमारें दोन वर्षे अलाहाबाद शहराची उत्तम सेवा बजावली. पण

त्यांच्यासारख्या भारतीय कीर्तीच्या नेत्याला या छोटया नगरपालिकेच्या कार्यात काय राम वाटणार ? शेवटीं जवाहरलालजींनीं नगराध्यक्ष-पदाचा राजीनामा दिला

याच सुमारास अलाहाबाद तथा प्रयाग या पवित्र तीर्थक्षेत्रीं कुंभमेळा भरला त्रिवेणी संगमांत स्नान करून पुण्य पदरीं पाडावें या हेतूनें असंख्य यात्रेकरू प्रयाग क्षेत्रीं जमले पण उर्मट अधिकाऱ्यांनीं यात्रेकरूंवर स्नानबंदीचा हुकूम बजावला व कोणीहि त्रिवेणी संगमावर जाऊ नये असा इशारा दिला अर्थात्च हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या व परिस्थिति चिघळली सारे यात्रेकरू घाटावर जमले. या मनाई हुकमाविरुद्ध सत्याग्रह करण्याचा निश्चय जवाहरलाल नेहरू व संयुक्तप्रांताचे वयोवृद्ध नेते पंडित मदनमोहन मालवीयजी यानीं केला. सत्याग्रही मंडळींचें नेतृत्व करून ही मंडळी गंगामाईच्या घाटावर आली तेथें असंख्य घोडेस्वार, लाठीधारी सैनिक होतेच. सत्याग्रही मंडळींना अडविण्यात आलें त्यांनी बैठा सत्याग्रह सुरू केला. इतक्यात डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच, पंडित मालवीयांनीं घोडेस्वारांना दाद न देता 'हर गंगे' म्हणून गंगामाईंत उडी ठोकली वयोवृद्ध मालवीयजी खरोखर धाडशी होते ! त्याचेंच अनुकरण जवाहरलालजींनीं केलें व त्यांच्या मागोमाग हजारों यात्रेकरूंच्या गंगा, यमुना व सरस्वतीच्या पवित्र प्रवाहांत उड्या पडल्या संगमातील स्नानाचें पुण्य पदरी पडलें ! त्रिवेणी संगमावर स्नान करणाऱ्या मंडळींना फार काळ डांबून ठेविलें नाहीं व ताबडतोब त्यांची मुक्तता करण्यांत आली.

यापुढें मात्र जवाहरलालजींच्या तुरुंगवाऱ्या वारंवार सुरू झाल्या. जेव्हां जेव्हा ते तुरुंगाच्या बाहेर असत तेव्हां काँग्रेसचें प्रचार-कार्य मोठ्या तळमळीने ते करत. त्यांच्या पाठिंब्यामुळें व सहकार्या-मुळेच सेवादल तथा स्वयंसेवकदल स्थापन झालें. याच काळात संयुक्त-

प्रांतात राजकीय परिषद भरली व तिच्या अध्यक्षपदी जवाहर-लालजींची नियुक्ती झाली. या परिषदेंत त्यांनीं स्वातंत्र्याचें ईप्सित ध्येय स्पष्टपणें मांडलें. याखेरीज संयुक्त प्रांत कॉंग्रेसचे चिटणीस म्हणून त्यांची नेमणूक झाली व भरीस भर म्हणून, त्यांचें यशस्वी कार्य पाहून अखिल भारतीय कॉंग्रेसचे सरचिटणीस म्हणून त्यांची निवड झाली अशा तऱ्हेनें जवाहरलालजींना कार्यासाठीं फार मोठें क्षेत्र लाभलें

१९२६ मध्यें जवाहरलालजींच्या पत्नी कमला नेहरू [illegible] प्रकृति अतिशय बिघडली हवापालट केली तरच प्रकृतींत बदल होईल व उतार पडेल असा डॉक्टरांनीं सल्ला दिला व त्यानुसार जवाहर-लाल आपल्या आजारी पत्नीस घेऊन युरोपात गेले. बरोबर मेहुणे रणजीत पंडित व धाकटी बहीण स्वरूपराणी होती.

स्वित्झर्लंडमधील उत्साहवर्धक, आरोग्यदायक हवामानामुळें कमलाजींची तब्येत सुधारू लागली जवाहरलालनीं आपल्या रुग्ण पत्नीची सेवा शुश्रूषा मन लावून केली पत्नीला बरें वाटल्यावर त्यांनीं युरोपांतील विविध देशांना भेटी दिल्या तेथें वास्तव्य करीत अस-लेल्या हिंदी लोकांची गाठभेट घेतली त्यांच्याशी स्वातंत्र्य चळवळी-विषयीं चर्चा केली या सुमारास ब्रूसेल्स नगरांत साम्राज्यविरोधी राष्ट्रांची शांतता परिषद आयोजित करण्यात आली होती बरेच प्रतिनिधि या परिषदेस उपस्थित राहिले होते. भारताचे व कॉंग्रेसचे नेते म्हणून जवाहरलाल नेहरू प्रतिनिधी या नात्यानें परिषदेस हजर राहिले व त्यांनीं त्या परिषदेंत उत्साहानें भाग घेतला साम्राज्यशाही-विरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारण्याचा महान् संदेश ब्रूसेल्स परिषदेनें दिला. याच वेळीं जवाहरलालजींना व मोतीलालजींना, सोव्हिएट रशियास भेट देण्याचें आमंत्रण मिळालें. त्यानुसार नेहरू कुटुंब रशियाच्या दहाव्या स्वातंत्र्यसोहळ्यास हजर राहिलें। रशियानें अल्पकाळांत केलेली महान् प्रगति पाहून नेहरूंना आश्चर्य वाटलें.

परदेशाहून परतल्यावर, भारतभूमीवर पाऊल ठेवताक्षणी त्याच्या राजकीय चळवळींना पुन सुरुवात झाली १९२७ सालच्या मद्रास काँग्रेस अधिवेशनांत जवाहरलालजी, सुभाषचंद्र बोस या झुंझार, तरुण नेत्यानीं संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याचा ठराव मांडला व तो संमत करून घेतला या ठरावामुळें स्वातंत्र्य आंदोलनास तर तेजस्वी धार चढली व स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांना आवेश चढला या वेळीं सायमन-कमिशन, पुढाऱ्याना आमिष दाखविण्यासाठीं भारतांत आलें. तो कावा ओळखन सायमन कमिशनचा तीव्र निषेध करण्यात यावा, त्याला काळीं निशाणे दाखवावीत, विरोध करावा असा आदेश काँग्रेसने दिला. त्याप्रमाणें या कमिशनचा ठिकठिकाणीं निषेध झाला त्यांना प्रचंड विरोध सहन करावा लागला व ठायीं ठायीं काळी निशाणें पहावीं लागलीं तेव्हां संतापलेल्या अधिकारी वर्गानें दडपशाहीचें सत्र सुरू केलें व च अत्याचारास सुरुवात केली लाहोर येथें पंजाबचें सिंह काँग्रेसचे वयोवृद्ध नेते लाला लजपतराय याच्या नेतृत्वाखालीं कमिशनच्या निषेधार्थ मोर्चा काढण्यांत आला या मोर्चावर सशस्त्र घोडेस्वारानीं हल्ला केला व सर्वांना बेदम झोडपलें, लाठीमार केला. वृद्ध लालाजींना तर लाठीचा खूप प्रसाद मिळाला. या मारामुळेंच लालाजींचे निधन झालें व साऱ्या देशांत असंतोष माजला लखनौ येथें हाच प्रकार घडला. मोर्चाचें नेतृत्व जवाहरलाल नेहरू व गोविंद वल्लभ पंत याच्याकडे होतें. सारें वातावरण 'सायमन गो बॅक' व स्वातंत्र्याच्या घोषणानीं निनादून गेलें. या मोर्चावर गोऱ्या घोडे-स्वारांनीं, सैनिकांनीं चढाई केली; सपासप लाठ्या चालविल्या सर्वजण मुकाट्यानें मार खाऊं लागले. त्यामुळें तर गोऱ्यांना अधिकच चेव चढला व त्यांनी अधिकाधिक मार देण्यास सुरुवात केली. इतर पांगले पण जवाहरलाल मात्र शेवटपर्यंत लाठीचा प्रसाद खात उभेंच होते! धन्य आहे या शूर वीराची! काठीचे तडाखे तडातड बसत

होते पण धैर्याचा हा मेरू शांतपणें खडा उभा होता अन् मार सहन करीत होता. शेवटीं जवाहरलाल त्या निर्घृण निर्दय मारानें बेशुद्ध होऊन खालीं पडले. पण त्यानीं माघार मात्र नाहीं घेतली! त्याना तेथून दूर उचलून नेण्यात आलें शुद्धीवर आल्यावर ते आवेशानें उद्गारले, 'अरे मला रणांगणावरून येथें का आणलें ?' धारातीर्थी मृत्यु आला तर तो मंगल होय! आपलें कार्य आपण सरकारी विरोधामुळें थांबविता कामा नये! " या सुमारास नागपूरला ट्रेड युनियनचें अधिवेशन भरलें होतें अन् जवाहरलाल नेहरू हे त्याचे अध्यक्ष होते

१९२९ चें लाहोर काँग्रेस अधिवेशन खूपच गाजलें. कारण तरुण जवाहरलाल या काँग्रेसचे अध्यक्ष होते रावी नदीच्या काठी "लाला लजपतराय नगर" उभारण्यांत आलें होतें याच नगरात यापूर्वीच्या कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षपदीं असलेले पंडित मोतीलालजी नेहरू यानीं अध्यक्षीय सूत्रें, नव्या, उत्साही तरुण अध्यक्षाकडे, जवाहरकडे भारतमातेच्या थोर सुपुत्राकडे सोंपविली हा प्रसंग खरोखर अपूर्व, विलक्षण होता! आपल्या अध्यक्षीय भाषणात जवारहलालजींनीं संपूर्ण स्वातंत्र्य व समाजवाद या तत्त्वाचा आवेशानें पुरस्कार केला

या अधिवेशनाचा संदेश घेऊन मंडळी परतली ती नव्या उत्साहानेंच! स्वातंत्र्य चळवळीला तेज चढलें अन् सर्वच भारतभर काँग्रेसच्या आदेशानुसार कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. बापूजींची दांडीयात्रा सुरू झाली, मीठकर कायदा, जंगलकर कायदा नष्ट करा अशा आरोळ्या ठिकठिकाणीं उठल्या कायदे तोडण्यात आले त्याचा भंग करण्यांत आला अन् अखेर सरकारनें आपले नेहमींचें शस्त्र उपसलें! दडपशाहीला सुरुवात केली. सर्व पुढारी तुरुंगात अडकले जवाहरलालजींच्या नशिबी कायदेभंगाबद्दल तुरुंगवासाची शिक्षा आली व नैनी तुरुंगाकडे त्याची रवानगी झाली

मोतीलालजी आतां वयोवृद्ध झाले होते त्यातच विविध राजकीय चळवळी, कारावास यांमुळें त्याची प्रकृति खालावत गेली. तुरुगातील हाल त्याना सहन होईनांत जीवाची ओढाताण होऊ लागली. दोऱ्याचा त्रास होऊ लागला. पण सार सारं त्यानीं सहन केले. अखेर सहा फेब्रुवारी १९३१ सालीं भारतमातेचा हा थोर सुपुत्र साऱ्या भारतीयांना दु खसागरांत लोटून निघून गेला जवाहरलालजींना पितृवियोगाचा जबरदस्त धक्का बसला !

पितृवियोगाचें दु ख विसरण्यासाठीं जवाहरलालजींनीं काँग्रेस-कार्यांत अधिकाधिक लक्ष घातलें. प्रचारकार्यासाठीं झंझावाती दौरे काढले. जाहीर सभासभातून भाषणें दिलीं, जनतेला जागृत केलें, स्वातत्र्य लढ्याचा तेजस्वी इतिहास सांगितला व स्वातत्र्याचा दिव्य सदेश देऊन ही चळवळ जोमानें पुढें चालवा असा जनताजनार्दनाला आदेश दिला ! ब्रिटिश राज्यकर्त्यांवर त्यानीं टीकास्त्र सोडलें व राज्यसत्तेनें जवाहरविरुद्ध आपलें अस्त्र उपसलें. जवाहरलालजींना राजद्रोहाबद्दल अटक झाली. पण हा कारावास त्याना नित्य-परिचयाचाच झाला होता ! देशभक्तांचें निवासस्थान म्हणजे तुरुंगच होय ! त्याला कोण भिणार? स्वातत्र्य चळवळीचे सैनिक कारागृहाला थोडेच डरणार ? अन् ब्रिटिश राज्यकर्त्यांना थोडेंच शरण जाणार? छे ! छे !! नाव नको त्यापेक्षां मरण पत्करणार ! १९३४ मध्यें बिहार प्रातात फार मोठा भूकप झाला आधींच राज्यकर्त्यांनीं छळ चालविला होता. त्यांत ही भर ! बिहारी जनतेचें जीवनच उद्ध्वस्त झालें पण जवाहरलाल त्या जनतेला दिलासा देण्यासाठीं, मदतीचा हात पुढें करून धावून गेले याबद्दल त्याना बक्षिशी मिळाली. कोणती तर तुरुगवासाची ! तुरुगाबाहेर असतांना जवाहरलालजींचें प्रचारकार्य जोरांत चाले; सभा परिषदा आयोजित केल्या जात, स्वातंत्र्याचा सदेश दिला जाई. मग राजद्रोह वा कायदेभगाबद्दल त्याना अटक

होई, कारावास भोगावा लागे हा क्रम सतत चालू होता त्यात खंड नव्हता नैनीच्या तुरुंगात असतानाच त्यांना सतत सहकार्य देणाऱ्या, त्यांच्या प्रिय पत्नीची, कमलेची प्रकृति बिघडली, अतिशय खालावली कमला नेहरू दिवसेंदिवस क्षीण होऊं लागल्या. पत्नीच्या आजारपणा-मुळें जवाहरलालजींची मुक्तता करण्यात आली. आपल्या पत्नीची प्रकृति पहातांच जवाहरलालजींना चांगलाच धक्का बसला ! डॉक्टरांनीं हवापालट करण्याचा सल्ला दिला. पण युरोपातील हवामान कमलाजींना मानवलें नाहीं अखेर निर्घृण काळानें डाव साधला स्वित्झर्लंड येथें २८ फेब्रुवारी १९३६ रोजी, स्वातंत्र्य–चळवळींतील ही झुंझार स्वयंसेविका, देवाघरी,स्वतंत्र भूमीकडे निघून गेली वीस वर्षांच्या संसारातील सहचरी, सोबती, अर्धांगी निघून गेली जवाहर-लालजींची प्रेरक शक्ति, उत्साहदायक शक्ति नाहीशी झाली प्रत्येक कार्यांत तिचें जवाहरलालजींना सहकार्य होतें स्वातंत्र्यसंग्रामात कमलानें हिरीरीनें भाग घेतला होता व कारावास पत्करला होता सत्याग्रह केला होता, मिरवणुका काढल्या होत्या ! तिच्या अखेरच्या दुखण्याच्या वेळीं जवाहरलाल तुरुंगात होता, पण कमला डगमगली नाहीं. भीति हा शब्द तिला माहित नव्हता उलट तिनें जवाहरलालजींना कळविलें, " माझ्यासाठी सुटकेची याचना तुम्ही करूं नका! " कमला नेहरू म्हणजे खरीखुरी आदर्श भारतीय नारी होती !

प्रिय पत्नीच्या दुःखद निधनानें, जवाहरलालजींना अतिशयच शोक झाला. शोकावेगामुळें तें पत्नीच्या स्मृति आठवत स्वस्थ बसून राहत पत्नीवियोगाचा धक्का त्यांना बसला होता ! अंतःकरण अत्यंत व्यथित झालें होतें !

या दुःखातून दिलासा मिळावा, पत्नीची सतत आठवण होऊं नये म्हणून दिवसाचे अठरा अठरा तास ते कॉंग्रेसचें कार्य करूं लागले,

मान मोडेपर्यंत काँग्रेसचें प्रचारकार्याचे कष्ट उपसू लागले याच वर्षी लखनौ काँग्रेसचें अधिवेशन झालें मोतीलालजी नेहरूंच्या स्मृति-प्रीत्यर्थ 'मोतीनगर' उभारण्यात आलें व त्यांत हें अधिवेशन पार पडलें या काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलालच होते कांहीं महिन्यानंतर महाराष्ट्रांतील फैजपूर येथें काँग्रेस अधिवेशन भरलें ! हें पहिलें ग्रामीण भागातलें अधिवेशन फैजपुरलाहि जवाहरलालजीच अध्यक्ष होते एका वर्षांत दोनदा भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे, दोनदा अध्यक्ष होण्याचा मान जवाहरलालजींना मिळाला ! या अधिवेशनातून, अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणातून स्वातंत्र्याचा दिव्य संदेश त्यांनी दिला व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोणकोणते कार्यक्रम काँग्रेस हातीं घेणार व समाजवादी समाजरचनेच्या दिशेनें कशी पावलें उचलणार यासंबंधीचें स्पष्ट विचार त्यांनीं मांडले हे विचार जनतेत फैलावें, चळवळीला नवी धार यावी म्हणून भारतभर त्यानीं दौरा आंखला भारताच्या उत्तर टोंकापासून तो थेट दक्षिण टोंकापर्यंत,कन्याकुमारी, रामेश्वरपर्यंत ! या विचारांचें लोण त्यांनी सर्वत्र पसरविलें

थोड्या दिवसांनी जवाहरलालजींना परत दुःखाचा डोंगर सहन करावा लागला कारण त्यांच्या नशिबीं मातृवियोग आला होता पंडितजींच्या मातेनें, स्वरूपराणीनेंहि स्वातंत्र्यचळवळींत भाग घेतला होता एकदा तर चळवळीचें नेतृत्व करणाऱ्या या महान् स्त्रीवर अधिकाऱ्यांनीं हल्ला केला; ढकलाढकली झाली व स्वरूपराणी धुळीच्या रस्त्यावर कोलमडून पडल्या त्याना मुका मार बसला. स्वरूपराणीच्या झालेल्या या छळामुळें तर सारी जनता चिडली,तिला त्वेष चढला व स्वातंत्र्य–आंदोलन अधिक प्रभावी झालें जवाहरला सतत धीर देणारी, पाठिंबा देणारी स्वरूपराणी, आपल्या थोर, महान् सुपुत्राला मार्गे सोडून निघून गेली हें नेहरू कुटुंब म्हणजे खरोखरच देशभक्त, देशाभिमानी कुटुम्ब होतें सर्व कुटुंबीय मंडळींनीं राष्ट्राची सेवा

केली, भारतमातेची सेवा केली मातृवियोगाचें अतीव दुःख जवाहर-लालला झालें ।

धाईगर्दीच्या, गडबडीच्या जीवनाला थोडोफार उसत मिळावी व इतरत्र चाललेले स्वातंत्र्यलढे पहावेत या हेतूनें, मातेला पारखे झालेले, दुःखी जवाहर युरोप दौऱ्यावर गेले. युरोपांतील विविध देशाना आग्नेय आशियातील देशांना त्यांनीं भेटी दिल्या प्रत्येक ठिकाणीं त्यांचें अपूर्व स्वागत झालें कारण भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचें शूर सेनानी, झुंझार लढवय्ये म्हणून त्यांची ख्याति होती. याच सुमारास साम्राज्यशाहीविरुद्ध जर्मनी, इटली व जपान यानीं युद्ध पुकारले व त्याचें दुसऱ्या जागतिक महायुद्धात रूपांतर झालें. त्यात सारी मानव-जात होरपळून निघाली. भारतांत तर स्वातंत्र्यलढ्याचें अखेरचें पर्व सुरू झालें ।


☆

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...३८०७९... दि: ...
क्रमांक ...९२३८... नोंद दि. ...१०।८।८५

प्रकरण सहावें

# स्वातंत्र्यलढ्याची समाप्ती अन्....
# पंतप्रधानपदीं नियुक्ति

परदेशाचा दौरा आटोपून जवाहरलाल, नव्या उत्साहानें, नव्या उमेदीनें, नव्या जिद्दीने व स्फूर्तीनें भारतात परतले अन् अचानक दुसऱ्या जागतिक महायुद्धास तोंड लागलें साम्राज्यशाहीविरुद्धच जणू युद्ध सुरू झालें होतें इंग्लंड या महायुद्धात गोवलें गेलें आणि साऱ्या अंकित राष्ट्रांनीं, गुलाम राष्ट्रांनीं इंग्लंडला तनमनधनानें मदत करावी अशी ब्रिटिश सरकारनें आज्ञा दिली. भारतीय जनता आधींच अत्यंत रागावलेली, चिडलेली अन् पेटलेली होती ती थोडीच या आज्ञेची अंमलबजावणी करणार ? उलट ही आज्ञा पार धुडकावून लावण्यात आली महात्मा गांधींनी तर इंग्रज राजवटीविरुद्ध जोरदार स्वातंत्र्यलढा देण्याचें ठरविलें त्यांनीं ब्रिटिशांना स्पष्ट ठणकावलें, "या महायुद्धापासून भारत सर्वस्वीं अलिप्त राहील, तटस्थ राहील साम्राज्यशाहीचें विसर्जन करून स्वातंत्र्य प्राप्त करून घेईपर्यंत भारत चळवळ करीत राहील! लढे देत राहील!" महायुद्धाची आणीबाणीची परिस्थिति जाहीर झाली. इंग्रजावर आता संकट आलें आहे आकाशाची कुऱ्हाड त्यांच्यावर



जनताजनार्दनाला अभिवादन !

कोसळली आहे, आपण याचा फायदा उठविलाच पाहिजे, अस सर्व मान्यवर कॉंग्रेस–पुढाऱ्यानी ठरविलें इग्रजांनीं याला प्रत्युत्तर दिले ते दडपशाहीने ! तेव्हा जवाहरलाल नेहरूनी वैयक्तिक सत्याग्रहाचा आदेश सर्वांना दिला देशाभिमानी, देशभक्त, स्वातंत्र्यप्रेमी हिंदी बापवानीं, भारताला महायुद्धात सक्तीनें भाग घेण्यासाठीं, जबर-दस्तीनें प्रवृत्त केलें म्हणून ब्रिटिशाविरुद्ध तीव्र निषेध प्रकट केला व सत्याग्रह सुरू केला. या वैयक्तिक सत्याग्रहाविरुद्ध दडपशाहीचा, अत्याचाराचा वरवटा फिरू लागला जवाहरलालजींना व त्यांच्या सर्व अनुयायाना अटक करण्यात आली भराभर तुरुंग भरू लागले. जवाहरलाल जरी तुरुगात गेलें तरी चळवळ मात्र जोरात सुरू झाली, फोंफावली इग्रजांना चागलीच धडकी भरली सरकारला विचार करण्याची पाळी आली ते अतर्गत चळवळीकडे लक्ष देणार कीं जाग-तिक महायुद्धात लक्ष घालणार ? दोन्हींकडून चागलाच उठाव झाला त्यामुळें इग्रज जेरीस आले त्यांनीं साऱ्या सत्याग्रहींची मुक्तता केली पण भारताच्या स्वातंत्र्याबाबत मात्र ते अवाक्षरहि काढेनात, भारताला स्वातंत्र्य द्यावयाचें नाहीं असाच जणू त्याचा निर्धार होता.तेव्हां स्वातंत्र्य देण्याच्या बाबतींत कोणतीच भूमिका ते घेईनात. सर्व भारतीय नेत्याचें इग्रजाना एकच सागणें अन् एकच मागणें, " आम्हांला स्वातंत्र्य केव्हा देणार तें बोला ! " पण ब्रिटिश राजवट नेमका हाच मुद्दा टाळी. तेव्हां ब्रिटिश सत्तेविरुद्ध अखेरचा रामबाण उपाय म्हणून " क्रांती "चें निशाण फडकलें । १९४२ ची अपूर्व, अभूतपूर्व क्रांति ! भारतीयाच्या मुखामुखातून क्रांतीची भाषा येऊ लागली " ब्रिटिश सरकारनें या क्षणाला,आपली सारी सत्ता, मत्ता गुडाळून ठेवावी व तडक भारतातून चालते व्हावें ! " अशी घोषणा प्रत्येक व्यक्ति करू लागली. मुबई येथे भरलेल्या कॉंग्रेस सभेंत महात्मा गांधींनीं ब्रिटिशाना उद्देशून स्पष्ट उद्गार काढले, " चले जाव, गेट आऊट ! क्विट इंडिया ! ! जवाहर-

लालजींचा या सैन्यांतील आवेश, त्वेष तर विचारूंच नका. भाषणातून जवाहरलाल गर्जत होते. डोळ्यांतून आगीच्या ठिणग्या पडत होत्या जणू! एकेक शब्द म्हणजे जळता निखाराच, ब्रिटिशांच्या कुटील, कपटी नीतीमुळे जवाहर अतिशय संतापले होते ते त्वेषाने उद्गारले, "ब्रिटिश सरकार अगदीं नालायक आहे. त्याचा अन्यायी कारभार पाहून माझ्या शरीराचा भडका उडतो आहे मी माझा संताप आवरूं शकणें केवळ अशक्य आहे. हें परकीय सरकार नष्ट झालें पाहिजे दुसऱ्या महायुद्धांत लोकशाहीचा जय होण्यासाठीं व जगात शांतता नांदण्यासाठीं हा भारत स्वतंत्र झाला पाहिजे! अन् तोही याच क्षणीं!"

'छोडो भारत'च्या गर्जना साऱ्या भारतातून, दशदिशातून होऊ लागल्या क्रांतीचा वणवा चांगलाच पेटला अन् इंग्रज सरकार त्यांत होरपळू लागलें, जिकडेतिकडे 'स्वतंत्र भारत' अन् 'छोडो भारत' ह्यांच्या घोषणा होऊं लागल्या याचा परिणाम म्हणजे, जवाहरलालजी, महात्मा गांधी व इतर भारतीय नेत्यांना अटक करण्यात आली व तुरुंगांत डांबण्यांत आले अहमदनगरच्या किल्ल्यात पंडित जवाहरलालजींची रवानगी झाली या क्रांतीचा फायदा घेऊन सुभाषचंद्र बोसांनीं 'आझाद हिंद सेना' स्थापन करून,भारताबाहेर जाऊन भारतीय स्वातंत्र्याचा उद्घोष केला! सिंगापूर, अंदमान, निकोबार येथे तिरंगा फडकला अन् सुभाषचंद्राच्या नेतृत्वाखालीं फौजा, भारताकडे निघाल्या व इंग्रजांना ठिकठिकाणीं धडक देऊं लागल्या आता मात्र इंग्रजाच्या पोटांत भीतीचा गोळाच उठला! जिकडून तिकडून त्यांच्याविरुद्ध उठाव अन् क्रांति! सुभाषचंद्र बोस खरोखर अत्यंत शूर, धाडशी अन् कल्पक क्रांतिकारक होते त्यांचा बेत फसला, नाहीं तर इंग्रजाची चांगलीच कंबक्ती भरली होती. सुभाषचंद्रांचा दुर्दैवानें विमान–अपघातात अंत झाला अन् भारतमाता एका थोर सुपुत्राला मुकली!

ग्रं. क्र. ९८७८५

असंख्य क्रांतिकारकानी क्रांतीचे महान् कार्य केले. या क्रांतीच्या आगीची धग ब्रिटिश सत्तेला चांगलीच लागली

अखेर महायुद्ध सपलें युद्धांत अमेरिकेच्या साहाय्यामुळेंच केवळ इंग्लंडला जय मिळू शकला पण त्याची महाभयंकर हानि झाली. भारतात स्वातंत्र्यलढे सुरू होतेच आतां भारतावर प्रभुत्व ठेवणें केवळ अशक्य आहे हें इंग्रजाना पटलें। त्याना स्वातंत्र्य दिलें पाहिजे याची जाणीव पंतप्रधान अॅटली व ब्रिटिशाना झाली पण हे स्वातंत्र्य सुखासुखीं द्यावयाचें नाहीं, त्यात कांहींतरी भानगडी करून ठेवावयाच्या अन् मग सत्तातर करावयाचें असं इंग्रजानीं ठरविलें 'फाळणीसह स्वातंत्र्य स्वीकारा' असं इंग्रजाचें म्हणणें तर 'आम्हांस 'अखंड भारत' हवा' हें आमच्या थोर नेत्याचें म्हणणें। इंग्रजानी पाकिस्तानला आपल्या हातचें कळसूत्री बाहुलें बनविलें। पाकिस्तान इंग्रजाच्या म्हणण्याप्रमाणें वागू लागले. अन् अधिकाधिक तंटे होऊ लागले याच सुमारास नेताजी सुभाषचंद्रांच्या आझाद हिंद फौजेवर राजद्रोहाचे खटले भरण्यात आलें होतें आझाद हिंद फौजेच्या मदतीसाठीं जवाहरलाल धावून गेले व त्यांनीं भारतमातेच्या मुक्ततेसाठीं अविरत श्रम करणाऱ्या शूर सैनिकाना सक्रिय सहकार्य दिलें व वकिलकीचीं वस्त्रे ३० वर्षांनंतर परत बाहेर काढून, खटला यशस्वी रीतीनें लढविला व आझाद हिंद फौजेच्या जवानाचा बचाव करून त्याना त्रधमुक्त केले. भारतीय बन्धूसाठीं जवाहर लढले।

अखेर स्वातंत्र्यलढ्याची अखेर आली। स्वातंत्र्य चळवळीचें पर्व संपलें। गुलामगिरीच्या पकात रूतून बसलेली मातृभूमि स्वतंत्र होण्याचा क्षण नजीक आला पारतंत्र्याच्या शृंखला तडातड तुटल्या १५ ऑगस्ट १९४७। आमची प्यारी मातृभूमि, भारतभूमि स्वतंत्र झाली याचें सारें श्रेय, भारतभूमीच्या स्वातंत्र्या-

साठीं अहर्निश झटणाऱ्या, प्राणपणानें लढत देणाऱ्या जवाहरलालजींना बापूजींना व त्यांच्या असंख्य अनत स्वातंत्र्यवीराना आहे ! भारतीय जनताजनार्दनाच्या समोर इंग्रजानीं सपशेल लोटांगण घातलें व ते सारी सत्ता भारतीयाना देऊन, येथून निघून गेले ! मात्र जाताना त्यानीं भारत व पाकिस्तान अशीं दोन स्वतंत्र राष्ट्रें बनविलीं व या अखड भारताच्या फाळणीचें हलाहल भारतीयाना दिलें पण दूरदर्शी जवाहरनें हे हलाहल प्राशन केलें !

१५ ऑगस्टच्या सुमुहूर्तावर नवे पतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या शुभहस्तें लालकिल्ल्यावर तिरगा फडकला भारतीयाच्या आनंदाला, उत्साहाला पारावार नव्हता ! इतिहासात सुवर्णक्षरानीं लिहिण्याजोगी अभूतपूर्व घटना घडली होती ! पारतत्र्यात खितपत पडलेला भारत स्वतत्र झाला होता उभ्या भारतांत स्वातत्र्यदिनाचा सोहळा अत्यंत उत्साहांत, आनदांत पार पडला स्वतत्र भारताचा जयजयकार सर्वत्र होत होता !

जवाहरलालजी नव्या, स्वतत्र राष्ट्राचे पतप्रधान झाले यात आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं कारण भारतभूमि स्वतत्र व्हावी म्हणून जवाहरलालजींनीं सतत प्रयत्न केले दास्यविमोचनास्तव स्वातत्र्य लढे लढविले त्यासाठीं नऊ वेळां करावास पत्करला स्वातत्र्य-चळवळींत ते नेहमीं अग्रभागीं असत "तुरुग म्हणजे आमचीं तीर्थ-स्थानें होत" असं जवाहर नेहमींच म्हणत असत. या तुरुगवासांत असतांना भारतीय जनतेच्या कल्याणासाठीं, हितासाठीं जवाहरलाल-जींनीं आपली लेखणी उचलली अन् विविध प्रकारचें समृद्ध लेखन करून भारतीयाना परिस्थितीचें यथार्थ ज्ञान दिलें स्वातत्र्यसग्रामात अस-तांना जवाहरलालजींच्या मनात जो असतोषाचा भडका उडाला, निराशा दाटली, दीनदलितांचीं दु:खें पाहून मनाची जी तडफड झाली,

परकीय सरकारची अत्याचारी, अन्यायी वागणूक पाहून, जी चीड आली त्याबद्दल त्यांनी लेखणी उचलली त्याच्या तेजस्वी, प्रभावी व धारदार व्यक्तिमत्वाप्रमाणेंच त्याची लेखणीदेखील होती बालपणापासून वाचनाचा दांडगा व्यासंग जवाहरलालजींना होताच या वाचनाचा व जगाविषयी असलेल्या परिपूर्ण ज्ञानाचा उपयोग त्यांच्या लेखनात झाला तुरुंगवासाची शिक्षा भोगत असताना देशभक्त जवाहरलालजींनीं आपली तेजस्वी लेखणी उचलली व भरपूर लिखाण केलें स्वतःचें 'आत्मचरित्र' लिहून त्याला त्रिखंडात कीर्ति प्राप्त करून दिली. अलौकिक, अपूर्व ग्रंथ म्हणून या आत्मचरित्राचें अतोनात महत्त्व आहे मानवी इतिहासाचें व जागतिक इतिहासाचें मनोज्ञ दर्शन पत्र-रूपानें त्यांनीं आपल्या कन्येस करून दिलें हा ऐतिहासिक ग्रंथहि लोकप्रिय ठरला भारतदर्शन, सोव्हिएट रशिया हे ग्रंथ देखील अपूर्व असेच आहेत कांहीं वेळेस, वृत्तपत्रातून ललित लेखदेखील जवाहर-लालजींनीं लिहिले. ग्रंथनिर्मिती थोडी असली तरी गुणांच्या बाबतींत हें ग्रंथ फार मोलाचे आहेत गुणसंपन्न ग्रंथकार या नात्यानें जवाहर-लालजींची योग्यता फार मोठी आहे त्याचे ग्रंथ हे स्वतंत्र भारताचा मूल्यवान ठेवा होय ! जवाहरलाल जर राजकारणात पडले नसते तर प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणून त्यांनीं त्रिखंडांत लोकप्रियता संपादन केली असती यात बिलकुल संदेह नाहीं त्याचे ग्रंथ हाच त्याचा दाखला होय ! जशी जवाहरलालजींची तेजस्वी लेखणी, तद्वतच त्यांची तेजस्वी वाणी समोरच्या व्यक्तीला आकर्षून घेई ! मोहून घेई !! तसेंच त्याचें व्यक्तिमत्व ! किती प्रभावी, किती रुबाबदार. अन् त्यामुळेंच तर साऱ्या भारतीयाची मनें जवाहरलालजींनी आकर्षून घेतलीं ऐतिहासिक महान् परंपरा असलेल्या या प्राचीन भारतांत स्वातंत्र्याचा अरुणोदय ज्यावेळीं झाला त्या दिवशीं पंतप्रधान या नात्यानें साऱ्या भारतीय जनतेला उद्देशून त्यांनी जें भाषण केलें तें

अलौकिक अन् अपूर्व असेंच होतें हे भाषण चिरस्मरणीय ठरेल यांत शंका नाहीं जवाहर आपल्या भाषणात म्हणाले,

"भारताच्या स्वातंत्र्याचा महान् दिवस अखेर आज आला आहे. नियतीनें निश्चित केलेला हा दिवस आहे दीर्घकालीन निद्रेनंतर, स्वातंत्र्यलढा केल्यावर हिन्दुस्थान जागृत झाला आहे जिवंत रक्त त्याच्या नसानसातून सळसळू लागले आहे तो आज स्वतंत्र झाला आहे. आपल्याला खूप गोष्टी करावयाच्या आहेत नवीन, चांगल्या गोष्टी शिकावयाच्या आहेत त्या मार्गाने आपण चाललों आहोंत आजपासून नवा इतिहास सुरू झाला आहे आतां आपल्याला हा इतिहास आपल्या प्रत्यक्ष जीवनाच्या व कार्याच्या रूपानें बनवावयाचा असून पुढील पिढी आपला इतिहास लिहील

हा आजचा क्षण आम्हां हिंदी लोकांस, सगळ्या आशियास व जगास, भवितव्यावर परिणाम करणारा म्हणून महत्त्वाचा वाटेल ! आज नवा तारा उदयास आला आहे. पूर्वेकडील देशांच्या स्वातंत्र्याचा हा तारा आहे नव्या आशाआकांक्षांचा हा उदय आहे कितीतरी काळापासून दृष्टीपुढें तरळणारें दृश्य अखेर आज प्रत्यक्षात आलें. ह्या ताऱ्याचा कधींहि अस्त न होवो आणि आपली आशा कदापीहि खोटी न ठरो !

मध्यरात्रीच्या प्रशांत समयीं जेव्हां सारें जग गाढ निद्रेत आहे तेव्हा भारत जागा होत आहे स्वतंत्र होत आहे स्वातंत्र्याचा तारा उदयास आला आहे भारताची सेवा म्हणजे भारतात रहाणाऱ्या असंख्य जनतेची सेवा. दारिद्र्य, अज्ञान, विषमता यांचा शेवट करून प्रत्येक व्यक्तीला सुखी-समाधानी करावें ही आमची महत्त्वाकांक्षा आहे ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपण सतत झटू या! प्रयत्नशील राहू या " या उक्तीप्रमाणें पंतप्रधान जवाहरलालजींनी नव्या उमेदीनें, जोमानें राष्ट्रउभारणीचें कार्य त्वरित हातीं घेतलें.

वास्तविक नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारतापुढे कितीतरी समस्या निर्माण झाल्या होत्या किती अडीअडचणी समोर उभ्या राहिल्या होत्या नवभारताची चोख व्यवस्था लावावयाची होती अन्नधान्याचा प्रश्न सोडवावयाचा होता बेकारी दूर करावयाची होती आर्थिक स्थिति बळकट करावयाची होती निर्वासितांची समस्या, उद्योगधंद्यांतील शिथिलता, मागासलेपणा दूर करावयाचा होता. लोकांना शहाणे, ज्ञानी करावयाचें होतें. एक ना दोन हजारों ज्वलंत समस्या समोर उभ्या होत्या त्यात भर म्हणून इतका काळ आपण बंधुवत् ज्याला वागणूक दिली तें पाकिस्तान राष्ट्र आपल्यावर उलटलें होतें. त्यांनी भारतीयांवर अत्याचार सुरू केले. भाऊबंदकीप्रमाणें आक्रमणाशी वर्तन केलें ! शत्रू म्हणूनच आपली वर्तणूक ठेवली

..पण जवाहरलालजींच्या कुशल नेतृत्वाखाली साऱ्या समस्यांची हळूहळू उकल होऊ लागली ! या अडचणी दूर करून, नवभारताची उभारणी करण्याचे ध्येय, राष्ट्र सफल करण्याचें स्वप्न, जवाहरलालजींनी पूर्ण करण्याचे प्रयत्न केले. ज्या बिकट काळांत जवाहरलाल राष्ट्रविकासासाठीं झगडले, प्रयत्नशील राहिले, त्याचें स्मरण आपणांस होताच, आपलें मस्तक आदरानें खालीं झुकतें, हात जोडले जातात व मुखावाटें उद्गार बाहेर पडतात " धन्य धन्य तुझी महान् नेता ! " पंतप्रधान या नात्यानें जवाहरलालजींनीं साऱ्या समस्यांना प्रभावीपणें तोंड दिलें

ज्यावेळीं भारत स्वतंत्र झाला त्यावेळीं काही ठिकाणीं दंगली उसळल्या दिल्ली येथील कॅनॉट प्लेस येथें दंगल सुरू झाली व जाळपोळ, दुकानांची लुटालूट होऊ लागली अचानक जवाहरलाल तेथें आले व ही गुंडगिरी पाहून अत्यंत संतापले. जवळच्याच एका माणसाच्या हातातील काठी हिसकावून घेऊन ते तडक त्या गुंडांच्या गर्दीत शिरले

व त्याच्यावर तुटून पडले काय हा निर्भयपणा ! बेडरपणा ! ! जवाहर-लालजींना अन्याय अजिबात खपत नसे

पतप्रधान जवाहरलालजींबद्दल सर्व राष्ट्रांतील महान् नेत्यांनी गौरवोद्गार काढले आहेत भारताचा सर्वांगीण विकास, भारतमातेच्या या महान सुपुत्राकडूनच होईल असं कित्येकांनीं म्हटलें होतें व तें खरें ठरलें ! त्यांची पतप्रधानपदीं नेमणूक झाल्यावर ब्रिटिश साम्राज्याचे पंतप्रधान लॉर्ड क्लेमट अॅटली त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणाले, "पतप्रधान नेहरूंच्या ठायीं पौर्वात्य व पाश्चिमात्य कल्पनांचा सुरेख संगम झाला आहे." तर प्रख्यात अमेरिकन लेखिका पर्ल बक म्हणाली, "पंडित जवाहरलाल नेहरू हे विलक्षण उमदे, मनमोकळे व तरुण आहेत अमेरिकन जनतेला ते अत्यंत प्रिय आहेत "अॅडलाय् स्टिव्हन्सन म्हणतात," कालप्रवाहाला विशिष्ट दिशेनें गति देणारी सामर्थ्यवान् व्यक्ति म्हणजे जवाहरलाल होत " अनेकांचीं अन्तःकरणें आपल्या लेखणीनें, वाणीनें हलवून सोडण्याचें सामर्थ्य त्यांच्याजवळ होते ! " स्वतंत्र भारताचे पहिले उपपतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलालजींची थोरवी गातांना म्हणाले, " महात्मा गांधीजींनीं जवाहरलालजींना आपले राजकीय वारसदार म्हणून निवडलें आहे या पदासाठीं अत्यंत सुयोग्य अशी व्यक्ति निवडली गेली आहे." तर जवाहरलालबद्दल, भारताच्या या महान् सुपुत्राबद्दल, जनतेच्या आवडत्या नेत्याबद्दल, जवाहिराप्रमाणें तेजानें तळपणाऱ्या या जवाहराबद्दल राष्ट्रपिता महात्मा गांधींनीं गौरवोद्गार काढले: "शौर्य निर्धार कर्तृत्व सचोटी व तत्त्वनिष्ठा या गुणांनीं जवाहर-लालांनी भारतीय जनतेला जिंकले आहे जवाहरलाल कडक शिस्तीचे व गाढ निष्ठेचे भोक्ते आहेत थोर योग्यतेचे विश्वासु सहकारी ते आहेत. त्यांचें धैर्य तर असामान्य आहे त्यांच्या मनांत राष्ट्रप्रेमाचा झरा झुळझुळ वाहतो त्यांच्या अगीं योध्याची तडफ, धडाडी व

साहस आहेच. पण मुत्सद्याचे चातुर्यहि आहे ते अत्यंत सत्यनिष्ठ आहेत. त्यांचें वर्तन स्फटिकासारखे निर्मळ आहे जवाहरलालजींच्या हातात भारताचें भवितव्य अवलंबून आहे भारत देश जवाहरच्या हातात पूर्णपणें सुरक्षित आहे ''

— अशा या महान् नेत्याच्या कुशल नेतृत्वाखालीं, मार्गदर्शनाखालीं, लोकशाही राज्यपद्धतीचा पुरस्कर्ता भारत, विकासाच्या, प्रगतीच्या मार्गावरून घोडदौड करू लागला भारतभाग्यविधाते जवाहर हे भारतभाग्यास कारणीभूत झाले ! धन्य त्या पंतप्रधान जवाहरलालजींची !!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38069 दि:
क्रमांक 9230 नों. दि.

★



खेळकर जवाहर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८८९ .. दि: ...
क्रमांक ..९२३८.... नों दि १०/८/८४

प्रकरण सातवें

# भारतरत्न जवाहर

१५ ऑगस्ट १९४७ हा सुदिन भारताच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिला जाईल भारताचा हा स्वातंत्र्यदिन भारतीय स्वातंत्र्य लढ्याची अखेर, समाप्ती या मंगल दिनात झाली भारतभूमीचीं छकले करून, फाळणी करून इंग्रज येथील सत्तेचा त्याग करून इंग्लंडमध्यें आपल्या मायदेशीं निघून गेले. सान्या भारतीयांचें आशास्थान, आदरस्थान अन् अत्यंत लाडके नेते जवाहरलाल स्वतंत्र भारतभूमीचे पंतप्रधान झाले स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज ठरविण्यात आला. अन् तो म्हणजे अशोकचक्रांकित तिरंगा होय. कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांचें अत्यंत प्रसिद्ध गीत 'जनमनगण' हे राष्ट्रगीत संबोधण्यात आलें 'वंदेमातरम्' म्हणण्याची सर्वांना परवानगी मिळाली सारनाथ येथील अशोकस्तंभावरील सिंहचतुष्टय भारताचें राजचिन्ह ठरविण्यात आलें. 'सत्यमेव जयते' हें ध्येयवाक्य बनलें. याच काळात लोकशाहीप्रधान भारत देशाची राज्यघटना डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या विद्वानांकडून तयार करण्यात आली. त्यानुसार सार्वभौम, प्रजासत्ताक भारतभूमीचा राज्यकारभार पंतप्रधान जवाहरलालजींच्या कुशल नेतृत्वाखालीं सुरु झाला स्वतंत्र भारताला, पूर्वींचे सोन्याचे दिवस परत दाखवावयाचे

गेलेलें वैभव परत प्राप्त करून द्यावयाचें असा पणच जणू जवाहर-लालजींनीं केला होता अन् त्यासाठीं प्रयत्नाची पराकाष्ठा ते करीत होते आमच्या देशात लोकशाहीचें बीज रुजावयाचें नाहीं असा सर्व राष्ट्रांचा समज होता पण जवाहरलालजींनीं तो त्या राष्ट्रांचा गैर-समज आहे असें प्रत्यक्ष दाखवून दिलें अल्पावधींत त्यांनीं भारतात लोकशाही राज्यपद्धति स्थिर करण्याचा महान चमत्कार करून दाख-विला

भारतास ज्यावेळीं स्वातंत्र्य मिळालें त्यावेळीं आंतरराष्ट्रीय परिस्थिति बिघडू लागली होती हें बरोबर हेरून दूरदर्शी जवाहर-लालजींनीं राष्ट्रकुलाचें सदस्यत्व सोडलें नाहीं हे हितकर झालें साम्य-वाद व साम्राज्यवाद यांच्या जाळ्यांत गुतावयाचें नाहीं हें तर त्यांचें प्रथमापासूनचें धोरण ! त्यांचे अलिप्तवादी, तटस्थतेचें धोरण अनेक राष्ट्रांना फलदायी ठरलें स्वातंत्र्य मिळाल्याच्या आनंदात, उत्साहांत गर्क असतांना, सौख्याच्या अत्युच्चपदीं भारतीय व्यक्ति विराजमान झाली असतांना, एक अतिशय दु:खदायक प्रसंग सर्वांना सहन करावा लागला. हा केवळ दैवदुर्विलास होता सान्या भारतास शोकाकुल करणारी ती घटना म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधींचा वध होय ! बापूजींच्या निधनानें केवळ भारताचीच नव्हे तर सान्या विश्वाची अपरिमित हानि झाली नवभारताची विस्कटलेली घडी नीट बस-विण्याचें कार्य सुरू असतानाच, राष्ट्रउभारणीचें महान् कार्य करीत असतानाच भारतीयांना या दारुण प्रसंगास तोंड द्यावें लागलें बापू-जींचे तर जवाहरलाल मानसपुत्रच ! वारसदार ! जवाहरलालजींना बापूंच्या निधनानें किती दु:ख झालें असेल याची कल्पनाच केलेली बरी ! अत्यंत भारावलेल्या अवस्थेत दु:खमग्न जवाहरलालजींनीं, शोकमग्न भारतीयांसमोर याप्रसंगीं जें सांत्वनपर भाषण केलें ते खरोखर अविस्मरणीय होतें "मित्रहो, आपल्या जीवनातील दीप

मालविला गेला असून सर्वत्र अंधकार पसरला आहे. याप्रसंगीं तुम्हाला काय सांगू अन् कसं सांगू हेंच मला कळत नाहीं. आपले लाडके बापू आता आपल्यात नाहीत. यापुढें आपल्याला त्यांच्याकडे धांव घेतां येणार नाही, त्यांचा सल्ला घेतां येणार नाहीं. सहानुभूतीचे चार शब्द-देखील आता आपल्याला ऐकायला मिळणार नाहींत कोट्यवधि लोकां-वर हा दारुण आघात झाला आहे." जनतेला शोकांतून धैर्याकडे नेणें हे आपलें कर्तव्य आहे असं मानून जवाहरलाल पुढें म्हणाले, "आज-पर्यंत तेजानें तळपत राहिलेला तो दीप सामान्य नव्हता. गेलीं अनेक वर्षं या दीपानें देशाला प्रकाश दिला, अन् याहीपुढें अनेक वर्षं, हजारों वर्षं तो तसाच प्रकाश देत राहील. तो प्रकाश साऱ्या विश्वालाच मार्ग-दर्शक ठरेल! यापुढें आपण येणाऱ्या संकटांना एकजुटीनें, निर्धारानें तोंड देऊं या. पूज्य बापूजींच्या आदेशाप्रमाणें, शिकवणुकीप्रमाणे वागूं या."

यानंतर भारताचे भाग्यविधाते, भारतरत्न जवाहरलालजी, बापूजींच्या शिकवणुकीनुसार, स्वतःच्या खंबीर पावलांवर उभें राहिले. अन् मागासलेल्या राष्ट्राची शान, इभ्रत वाढविण्याचा प्रयत्न, सतत करूं लागले. स्वतंत्र भारतांत विविध मार्गांनीं आर्थिक विकासास प्रारंभ झाला. भारताला उत्कर्षाप्रत नेणाऱ्या पंचवार्षिक योजनांची निर्मिति जवाहरलालजींनींच केली. त्यासाठीं तज्ज्ञ, अनुभवी व्यक्तींचं 'नियोजन-मंडळ' नेमण्यात आलें. भारतभूमीला समृद्ध, संपन्न करणाऱ्या विकास-योजना आंखण्यांत येऊं लागल्या. त्यांचें उद्घाटन भारतभूमीचे तेजस्वी रत्न, भारतरत्न जवाहरलाल यांच्या शुभहस्तें होऊं लागलें.

ठायीं ठायीं आर्थिक प्रगति साधणारीं, विकास साधणारीं, आधुनिक भारताचीं तीर्थस्थानें निर्माण होऊं लागलीं. देशांतील उद्योगधंद्यांची वाढ झाली. नवीन नवीन कारखाने उभारले गेले. गिरण्या निर्माण झाल्या. त्यांत आधुनिक काळांतील यंत्रसामग्री बस-

विषयात येऊन औद्योगिक उत्पादनाचा वेग वाढला शेतींत क्रांतिकारक बदल झाला स्वतंत्र भारताला संपन्न करण्यासाठीं हरेक बाबतींत प्रयत्न होऊं लागले

याचवेळीं स्वतंत्र भारताचे प्रसन्न व्यक्तिमत्व असलेले, उमदे चैतन्यशील, भारतीय जनतेच्या गळ्यातील कंठमणि असलेले लाडके पंतप्रधान आपल्या देशांतहि यावे म्हणून निरनिराळे देश त्यांना भेटींची, दौऱ्याचीं आमंत्रणें देऊं लागले जवाहरलालजींची पंतप्रधानपदीं नियुक्ति झाल्याबरोबर सधन, संपन्न अमेरिकेचे, राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनीं जवाहरलालना अमेरिका भेटीचें अत्यंत आग्रहानें निमंत्रण दिलें त्या लोकशाहीप्रधान देशाचा दौरा करण्यासाठीं, तेथील संपन्न सुखसमृद्धीनें भरलेलें समाजजीवन पहाण्यासाठीं, अवलोकन करण्या-साठीं, विविध विकास योजनांच्या कार्यक्रमांच्या निरीक्षणासाठीं जवा-हरलालजींनी अमेरिकेस प्रयाण केलें पंतप्रधानांचें स्वागत करण्यासाठीं प्रेसिडेंट ट्रुमन यानीं खास "इंडिपेन्डंट नामक वायुयान पाठविलें होतें. अशा तऱ्हेनें अमेरिकेच्या राष्ट्रध्यक्षानीं नव्या, स्वतंत्र देशाच्या-व नव्या, कार्यरत, प्रसन्न व्यक्तिमत्वाच्या पंतप्रधानाचा यथोचित गौरव केला अमेरिकेच्या, लोकशाही देशाच्या भूमीवर पंतप्रधान जवाहरलालजींचा, या भारतरत्नाचा भव्य सत्कार करण्यांत आला. अमेरिकेंतील मंत्रीमंडळातील सर्व सदस्य, राजनीतितज्ज्ञ मुत्सद्दी, संशोधक व करोडो अमेरिकन जनता या नव्या स्वतंत्र देशाच्या लोकप्रिय पंतप्रधानाच्या स्वागतासाठीं सहर्ष हजर होती

यापुढील पंतप्रधान जवाहरलालजींचे, अमेरिकेंतील सर्व दिवस अत्यंत गडबडीत गेले दररोज असंख्य कार्यक्रम, सत्कार समारंभ, सभासंमेलनें, परिषदा, भाषणे, मेजवान्या, भेटीगांठी यास दिवसाचे चोवीस तासदेखील अपुरे पडूं लागले सारा वेळ या कार्यक्रमात जाऊं लागला अमेरिकेंतील सर्व राज्याना भेटी देऊन, त्या सुवर्णभूमीचें

जवाहरलालजींनी सूक्ष्म निरीक्षण केलें। त्या सुवर्णभूमीतील सुख-समृद्धीनें, संतोष समाधानानें फुललेल्या, अमेरिकन जनतेंत जवाहर मिसळले, एकरूप झाले, समरस झाले त्या समाजजीवनाचा त्यानीं जवळून अभ्यास केला न्यूयॉर्क येथील मेयरानीं जवाहरलालजींचा जो अत्यंत भव्य सत्कार केला त्याला तोड नव्हती कोलंबिया व इतर नऊ विद्यापीठांनी जवाहरलालजींना, भारताच्या महत्त्वाकांक्षी, भारतीय जनतेच्या या थोर प्रतिनिधीचा यथोचित सत्कार करून, या कोहिनूर हिऱ्यास सर्वोच्च पदव्या अर्पण केल्या शिकागो, बोस्टन, सॅनफ्रॅन्सिस्को या शहरांच्या नागरिकत्वाचे हक्क त्यांना बहाल करण्यात आले

जवाहरलालांनीं याच मुक्कामात जगप्रसिद्ध संशोधक आइन्स्टाईन, अणुतज्ज्ञ ओपेनहिमर व इतर शास्त्रज्ञांची गाठभेट घेऊन जागतिक शांततेविषयी त्यांच्याशीं चर्चा केली

अमेरिकेत जवाहरलालजींनीं ठिकठिकाणीं जीं व्याख्यानें दिलीं स्वागतसमारंभास उत्तर म्हणून जीं भाषणें दिलीं त्यात नव्या युगाचें "शांततेचें महान तत्त्व' त्यानी विशद केलें शांततामय सहजीवनाचा त्यानीं आदेश दिला आपापसातील वैरभाव नष्ट व्हावा. एकमेकां-विषयीं वाटणारा द्वेष, भय, दूर व्हावें सत्तालालसेची, स्पर्धेची, आक्र-मणाची भावना नसावी नाहींतर जागतिक महायुद्धाचा वणवा साऱ्या जगात पसरेल व अखिल मानवजात त्या आगीच्या डोंबात होरपळेल! तेव्हा आपण लोकशाहीप्रधान राष्ट्रांनीं शांतता प्रस्थापित करून, स्नेह, सहकार्य, समता, ऐक्य, बंधुत्वानें वागून साऱ्या जगांत शांतीचें महान् साम्राज्य स्थापू त्यासाठी आज आपण बद्धपरिकर होऊं या! याच मार्गानें आपला विकास साधेल, आपली उन्नति होईल व शांतीचें साम्राज्य निर्माण होईल."

जवाहरलालजींनी पाश्चिमात्य राष्ट्रांना भेटी दिल्या, तद्वतच पौर्वात्य राष्ट्रांनाहि त्यांनीं भेटी दिल्या व शांततामय सहजीवनाचा महान संदेश त्यांनीं दिला

अमेरिका ही लोकशाहीप्रधान तर रशिया साम्यवादी ! दोन्ही राष्ट्रांत सतत तेढ ! या दोन सामर्थ्यवान राष्ट्रांना जो वठणीवर आणील, त्यावर जो आपल्या विचार, व्यक्तिमत्त्वानें प्रभुत्व गाजवील तोच शांतिदूत ठरेल जवाहरलालजींनीं हे अत्यंत थोर कार्य केलें कारण अखिल विश्वांत शांतता प्रस्थापित होण्यासाठीं तर या शांतिदूतानें शांतीच्या साम्राज्यातून अवनीवरतीं जन्म घेतला होता ना ! चढाईच्या, स्पर्धेच्या या बिकट काळात शांतिदूत जवाहरलालजींनीं सर्व विश्वाला शांततेचा महान् संदेश दिला व महाभयानक महायुद्धापासून, मानवजातीच्या महाभयंकर संहारक शस्त्रास्त्रांपासून मानवास दूरदूर नेलें ! त्याचें हें कार्य किती थोर होतें याची केवळ कल्पनाच केलेली बरी ! जेथें जेथें झगडे झाले, अन्याय, पिळवणूक झाली, अत्याचार, आक्रमण झालें तेथें तेथें जवाहर धांवून गेले. आपल्या असामान्य व्यक्तिमत्त्वानें त्यानीं तेथें योग्य न्याय दिला शांतता प्रस्थापित केली अनेक वेळा या विश्वाला त्यांनीं युद्धाच्या खाईतून ओढून काढलें, अखिल मानवजातीला वाचविलें व परत शांततामय सहजीवनाचें महत्त्व विशद करून शांतता प्रस्थापित केली. देशोदेशीं त्यानीं दौरा केला तो याच हेतुस्तव ! शांतिदूत जवाहरनें सामर्थ्यशाली अमेरिकेचा जसा दौरा केला तसा सोव्हिएट रशियाचासुद्धां केला "परस्परांविषयीं वाटणारे भय व वैरभाव, द्वेषभावना आपल्या मनांतून नष्ट करा म्हणजेच युद्ध नष्ट होईल व शांतता प्रस्थापित होऊन, शांततामय सहजीवनाचें आपलें ध्येय साकार होईल व त्याच मार्गानें आपला विकास होईल" हा मंत्र त्यांनीं रशियालासुद्धां दिला आपला सारा जन्म निर्भयतेने, शांततामय स्वातंत्र्यलढ्यात लढण्यासाठीं

ज्यानें घालविला त्या जवाहरचा हा मंत्र किती मौल्यवान आहे ! रशियांतदेखील भारताच्या या झुंझार लढवय्याचें, स्वतंत्र भारताच्या लोकप्रिय पंतप्रधानाचें ठिकठिकाणीं आदरातिथ्य झालें, भव्य स्वागत झालें. निरनिराळ्या शहरांतून जवाहरलालजींना, विविध कार्यक्रमांसाठीं पाचारण करण्यात आलें. प्रत्येक ठिकाणीं जवाहरलालजींनीं, स्वागतास उत्तरादाखल जीं भाषणें दिलीं तीं केवळ अविस्मरणीय ठरलीं. " शांततेसाठीं सतत प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या, शांततामय सहजीवन हें ध्येय मानणाऱ्या आपल्या मोठ्या राष्ट्राचें मी मन - पूर्वक अभिनंदन करतों. आपल्यावर जबाबदारी फार मोठी आहे, पण शांततामय मार्गानें आपण आपली जबाबदारी पार पाडाल व सान्य विश्वास मार्गदर्शक ठराल अशी मला खात्री वाटते " प्रत्येक भाषणांत जवाहरलालजींनीं शांततेचें तत्त्व स्पष्ट केलें. खरोखरच अखिल विश्वांत शांतता स्थापन करण्यासाठीं, अखिल मानवजात शांति-समाधानानें सुखी करण्यासाठीं या विश्वाच्या शांतदूतानें शांततेचं तत्त्व सर्वांना सांगितलें. केवढें हें महान् कार्य ! कारण या महान् तत्त्वामुळें आपण जगलों आहोंत, वाचलों आहोंत व प्रगति करून घेतों आहोंत. आपली मैत्री सर्वांशीं आहे याला कारण हेंच ! युद्ध टाळण्याचा तोडगादेखील हाच !

अखिल मानवजातीचा क्षणार्धांत संहार करणाऱ्या अणुबॉम्बचें उत्पादन, त्याचा प्रयोग व वापर यावर बंदी घालण्यात यावी व भीति संशय यानीं ग्रस्त बनलेलें वातावरण नष्ट करून शांतता व सहकार्य याचें वातावरण सर्वत्र निर्माण व्हावें म्हणून आपण सतत प्रयत्नशील राहूं असं या थोर शांतिदूतानें सर्वांना आश्वासन दिलें.

पंडितजींच्या शांततेच्या महान् तत्त्वांना, 'पंचशील'ला रशियाकडून पाठिंबा मिळाला हें भारतरत्न जवाहरचें फार मोठें यश होय ! हीं तत्त्वें खालीलप्रमाणें होतीं.

(१) राष्ट्रांनीं एकमेकांचें सार्वभौमत्व मान्य करणें
(२) प्रत्येकाला स्वातंत्र्य व स्वायत्तता असणें
(३) कोणावरहि आक्रमण न करणें
(४) राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करणें
(५) शांततामय सहजीवनाचें तत्त्व अंगिकारणें

या तत्त्वाचा सर्व राष्ट्रांनी आपल्या आचरणात उपयोग केला तर सर्व विश्वात शांततेचें साम्राज्य नांदेल व मानवजीवन शांतता, सुख, समृद्धि यांनीं बहरून येईल. या तत्त्वांनाच 'पंचशील' तत्वें म्हणतात

रशियाचा दौरा आटोपल्यावर भारतमातेच्या या महान् पुत्रानें, शांततेचें तत्त्व स्पष्ट करण्यासाठीं पोलंड, इटाली, युगोस्लाव्हिया, इंग्लंड व इजिप्त याहि देशाचा दौरा केला प्रत्येक ठिकाणीं त्या त्या देशातील अनंत नागरिकांकडून भारताच्या या 'कोहिनूर हिऱ्याचें', 'भारत रत्नाचें' अभूतपूर्व स्वागत झालें भारतरत्न जवाहरलालजींचा ठिकठिकाणीं अतिशय गौरव झाला पण त्यांचा हा गौरव म्हणजे साऱ्या भारतमातेचा गौरव होता. स्वतंत्र मातृभूमि, भारतभूमीचा हा गौरव होता

भारतरत्न, शांतिदूत जवाहरनें आफ्रिका व आशिया खंडांत जवळीक, आपुलकी निर्माण व्हावीं, मैत्रीचे संबंध अधिक वाढावेत म्हणून इंडोनेशियात बांडूग परिषद भरविली यात दोन्हीं खंडांतील बहुतेक देशाचे प्रतिनिधि हजर होते जवाहरलालजींनी या परिषदेचें नेतृत्व केलें व पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला ही परिषद अत्यंत गाजली व अनेक देशांदेशात मैत्री वाढली व भारताशीं तर साऱ्यांची दृढ मैत्री झाली. भारत देशाकडे सारें विश्व आशिया, आफ्रिकेचें, स्फूर्तिस्थान, आशास्थान म्हणून पाहू लागलें हें सर्व या भारतमातेच्या महान् सुपुत्रामुळें शक्य झालें साऱ्या विश्वात भारताची शान वाढली, इभ्रत वाढली व मानाचें स्थान म्हणून भारत ओळखला जाऊं लागला.

भारतदेशाशीं आपली मैत्री व्हावी म्हणून प्रत्येक राष्ट्र झटू लागलें. परकीय यंत्रज्ञ, शास्त्रज्ञ यांची हरेक प्रकारें मदत भारत देशास मिळाली परदेशांची आर्थिक मदत, अनुदाने आपणास मिळालीं व आपण आपला विकास साधू शकलों निरनिराळे भव्य प्रकल्प, धरण योजना, कारखाने, विद्युत्केंद्रे, गिरण्या, उद्योगधंदे हे निर्माण झाले भारत औद्योगिक दृष्टया व आर्थिक दृष्टया सपन्न रहावा म्हणून जवाहरलालजींनीं पंतप्रधान या नात्यानें अविश्रांत मेहनत घेतली व भारताचें पूर्वीचें चित्र पार बदलून टाकलें मागासलेल्या, अप्रगत भारताचें, प्रगत [illegible]

अन् तीदेखील अल्पावधींत यासाठीं त्यानीं देशोदेशीचे दौरे केले, तेथील आर्थिक जीवनाचा सूक्ष्म अभ्यास केला व त्या सपन्न अनुभवांचा भारतास लाभ करून दिला. शांततामय सहजीवनाचा पुरस्कार ठिकठिकाणी त्याच्याकडून होतच होता या कार्याबराबरच काँग्रेस पक्षाचें कार्यदेखील अत्यंत निष्ठेनें ते करीत होते जवाहरलाल नाहींत म्हणजे काँग्रेस नाहीं असे जणू समीकरणच बनले होतें १९५१ ते १९५४ पर्यंत त्याना पक्षानें परत अध्यक्षपदीं नेमिलें यावरून पक्षांत असलेलें त्याचें महत्त्वपूर्ण व अढळ स्थान सहज ध्यानात येतें साऱ्या भारतीय जनतेचें तर त्याच्यावर अतोनात प्रेम होतें. जवाहरलालवर सारे खूप प्रेम करीत. प्राणापेक्षाहि प्रिय असलेला हा ठेवा होता. जनतेनें आपल्यावर जें अलौकिक प्रेम केलें त्याबद्दल जवाहरलाल म्हणतात, "भारतीय जनतेनें माझ्यावर एवढें अपरपार प्रेम केलें आहे, एव्हढा जिव्हाळा दाखविला आहे कीं या प्रेमाची परतफेड अल्पांशानें करणें केवळ अशक्य आहे खरें म्हणजे जनतेच्या या प्रेमाच्या दिव्य भावनेची मी परतफेड कशी करूं शकणार? माझ्या वाट्याला भारताच्या सर्व भागातील, सर्व थरांतील जनतेचं जें प्रेम आलें त्यामुळे मी अगदीं भारावून गेलों आहे. या प्रेमाला मी पात्र ठरावें हीच माझी इच्छा!"

या जनतेच्या प्रेमाचे प्रतीक म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ पासून तों जीवनाची अखेर होईपर्यंत जवाहरलाल या भारतभूमीच्या पत-प्रधानपदीं होते. जवाहरलालवर जनतेचा अत्यंत विश्वास होता. त्यांच्याच मार्गदर्शनाखालीं आपण प्रगति साधू व भारताची मान विश्वात उच्च करूं अशी जनतेची श्रद्धा होती व ही श्रद्धा, निष्ठा पूर्णहि झाली ती जवाहरलालजींमुळेंच !

जवाहरलालजींनीं "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" अशा मातृभूमीची, भारतभूमीची दीर्घकाळ अमोल सेवा केली. शांततेचे पाईक, शांतीच्या साम्राज्याचे शांतिदूत म्हणून जें महान् कार्य त्यांनीं केलें त्या कार्याचे अल्पसें प्रतीक म्हणून त्यांना राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रबाबूंनीं "भारतरत्न" पदवी अर्पण केली. आपले जवाहरलाल खरोखरच भारताचें तेजस्वी रत्न होते ! भारतभूमीचें "कोहिनूर" होते ! या महान् शांतिदूतानें ठिकठिकाणी आपल्या कृतीनें, वाणीनें, लेखणीनें शांतीचा महान् संदेश दिला. देशादेशांत दौरे करून शांततामय सह-जीवनाचा उद्घोष केला. अखिल विश्वांतील मानवजातीला शांतता मिळावी म्हणून शांतीचें महान् कार्य सतत केलें. विश्वात शांतीचें साम्राज्य नांदावें म्हणून अविरत, अहोरात्र, अहर्निश प्रयत्नांची परा-काष्ठा करणाऱ्या या थोर शांतिदूतानें, शांतिकार्यास्तव तर या अवनी-वर जन्म घेतला नव्हता ना ? होय ! त्याचसाठी भारतरत्न जवाहर जन्मले होते. अखिल विश्वाचें शांतीनें समृद्ध असलेलें एकच राज्य असावें हे या शांतिदूताचें महान् स्वप्न होते. हें महान् स्वप्न प्रत्यक्षात साकार व्हावें म्हणून उभ्या हयातभर हा शांतिदूत सतत झगडला ! धन्य त्या शांतिदूत, भारतरत्न जवाहरची ! अन् धन्य त्या शांततामय मार्गानें वाटचाल करणाऱ्या भारतभूमीची ! !

★

स्थळप्रत




देशोदेशींच्या दौऱ्यावर

प्रकरण आठवें

# शांतिदूताचे महाप्रयाण .... !

केवळ भारतीयाची नव्हे तर यच्चयावत् मानवजातीची अविरत सेवा पंडित जवाहरलालजींनीं केली "हें विश्वची माझे घर ' अशी एक्य भावना प्रत्येक व्यक्तिमात्रांत निर्माण झाली पाहिजे असें जवाहरलालचें सांगणें होतें विश्वबंधुत्वासाठीं शांततेचा, स्नेहाचा दीप मार्गदर्शक ठरेल अशी त्यांची श्रद्धा होती त्यावर सतत निष्ठा ठेवून जवाहर प्रत्यक्ष कार्य करीत होते त्यासाठीं देशादेशात दौरे काढीत होते शांततेचें महान् तत्त्व सान्याना समजाऊन सागत होतें. समता, ऐक्य, बंधुत्व ह्या तत्त्वानीं युक्त असें शांततामय सहजीवन जगाला व मानवजातीला शांति देऊन सुखी करा असा संदेश जवाहरलाल ठायीं ठायी देत होते. नव्या युगाचें, नव्या तत्त्वाचें, नव्या ध्येयाचें प्रेरक, प्रवर्तक ते होते. त्या ध्येयप्राप्तीस्तव भारतमातेच्या कुशींत जन्म घेतलेल्या या भारत-रत्नानें अहोरात्र जीवाचें रान केलें.

भारतरत्न जवाहरलालजी म्हणजे दीर्घोद्योगी चिकाटीचें प्रतीक होत ! पंतप्रधान जवाहरलालजींची दिनचर्या पाहिली की हें पटेल यांत शंका नाहीं दिवसाचे पधरा ते अठरा तास, ते आपल्या कार्यांत मग्न असत त्याना सवड नसे भारताची सर्वांगीण प्रगति करून

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम ........ दि: ७२..........

क्रमांक ........ नों. दि ........



या भूमीस पूर्वीचें वैभव परत मिळवून द्यावयाचें असा त्याचा निर्धार होता; निश्चय होता त्या कार्यासाठीं जवाहरलालजींना दिवसाचे तासदेखील कमी पडत जवाहरलाल देशासाठीं, भारतीय जनतेसाठीं चंदनाप्रमाणें झिजले

" कणाकणानें ज्योत जळाली
उधळित तेजोधन

जगास द्याया शीतल लेपन
झिजलें हें चंदन ॥

हें जवाहरलालजींच्या बाबतींत पूर्णत्वाने सार्थ ठरतें जेथें जेथें स्वातंत्र्याचे झगडे झाले तेथें तेथें भारतरत्न जवाहरलालजींनी पाठिंबा दिला, तेथील नेत्यांना प्रोत्साहन दिलें जवाहरलालनें अन्याय, अत्याचार, विषमतेविरुद्ध अविरत लढा दिला,

ज्या ज्या वेळीं कामाच्या प्रचंड ताणानें, बोजानें, जवाहरलाल श्रांत होत, अहरात्र, [illegible] खांद्यांवर उपसणाऱ्या जवाहरलालजींना विश्रांतीची गरज भासे, त्यावेळी केवळ दोनचार दिवसांसाठीं आपल्या प्रिय जन्मभूमीकडे ,हिमालयाच्या कुशींत, काश्मिरांत ते जात. काश्मिर म्हणजे जणू स्वर्गातील रमणीय नंदनवनच ! काश्मिरचें जवाहरलालजींना फार आकर्षण होतें ! " पंतप्रधानकीच्या दगदगीमुळें, श्रमामुळें मी इतका थकलो आहे, इतका श्रांत झालों आहे की असं वाटतं हिमालयात या क्षणीं पळून जावें. तेथील निसर्गाशीं एकरूप व्हावें व आनंद चाखावा. पण प्रत्येकाला कर्तव्य आहेच या कर्तव्यापासून मुक्ति मिळत नाहीं या कर्तव्यनिष्ठेमुळेंच मी आपल्या जागी पाय रोवून अजून उभा आहे व राहीन ! " असें जवाहरलालजी मधून मधून म्हणत असत. काश्मिर म्हणजे निसर्गाच्या लावण्याचे जणू माहेरच ! या काश्मिरनें जवाहरलालवर अत्यंत मोहिनी

घातली होती. त्यामुळें श्रांत, थकलेले, दमलेले जवाहरलाल विसावा घेण्यापाठीं काश्मिरकडे वळत. या अलौकिक, असामान्य, अपूर्व नंदनवनाबद्दल जवाहरलाल म्हणत,

"एखाद्या लावण्यवती, रूपवान तरुण स्त्रीप्रमाणें, नद्या, सरोवरें, दऱ्याखोरे, वृक्ष यांनी संपन्न अशा काश्मिरचें सौंदर्य विश्वात्मक आहे. उभे डोंगरकडे, बर्फाच्छादित शिखरे, हिमनद्या, दऱ्याखोऱ्यांत उडया घेणारे भयंकर धबधबे हें सारे अपूर्व आहे! येथील निसर्ग विविध-रंगी विविधरूपी आहे. दाल सरोवरावरील धुक्याचे पुंजके दूर होऊ लागले की या सृष्टीचें अंतरंग दृष्टीस पडतें. एखाद्या गिरिशिखरास मिठी मारण्यासाठीं मेघमाला आपले बाहू पसरून येतात तर कधीं कधीं खोल दऱ्याखोऱ्यात निसटतात. नेहमी बदलणाऱ्या या अविस्मरणीय निसर्गदृश्यामुळें माझें भान हरपते!"

तर नगाधिराज हिमालयाचें वर्णन करीत असताना ते एका ठिकाणी लिहितात, "तिसऱ्या प्रहरच्या सूर्यानें बर्फ वितळते आहे पर्वतशिखरांवर मात्र ते तसेच आहे. मेघांनीं गाशा गुंडाळला आहे आकाश गंभीर निळेनिळे दिसत आहे. ते नीलाकाश! किती अपूर्व, आश्चर्यकारक अन् वेड लावणारे! मधून मधून ढगांचे खेळ सुरू होते. हसणाऱ्या सूर्याचे किरण पकडून ढग त्यांना चौफेर फेंकीत होते. सगळीकडे किरणच किरण! अपूर्व रंग येत होते, जात होते. नाना आकृत्या तयार होत होत्या, बदलत होत्या. रंगाचा धिंगाणा चालूच होता. उघडीबोडकी पर्वतशिखरें लाललाल दिसत होती. पेटलेले गोलकच जणू ते! खैबरखिंडीच्या आजुबाजूला असलेल्या पर्वत-प्रदेशाची आठवण मला या प्रसंगी झाली. सूर्यकिरणे पडून बर्फाच्छादित भाग चमके. या अपूर्व वातावरणात किती तरी वेळ मी बसून अवलोकन करीत होतो. अखेर चंद्र वर आला व त्यानें विचित्रतेत आणखी भर घातली."

हिमालयाच्या कुशीत, शांत निसर्गरम्य, एकांतीं दोनचार दिवस घालवून, ताजेतवाने होऊन जवाहरलाल परतत असत आल्या-बरोबर कार्यास दुप्पट वेगानें सुरुवात होई. सभासंमेलनें, परिषदा अधिवेशने भरविली जात, जवाहरलालजींचा झंझावाती दौरा सुरू होई देशांतील अन् परदेशांतील। क्षणाचीहि उसंत त्यांना मिळत नसे। आपल्या भारताची उन्नति व्हावी हीच त्यामागील प्रेरणा असे नवीन पिढीला नव्या युगाचा संदेश देताना, शांतिदूत जवाहरलाल म्हणाले' "साऱ्या विश्वाचा 'जगद्गुरु, बनणाऱ्या भारताचे स्वप्न मी मनाशीं बाळगून आहे आम्हाला आमचें भारतवर्ष कसे पाहिजे? आपली राष्ट्रीय उद्दिष्टें कोणतीं असली पाहिजेत या विषयी आम्हाला स्वच्छ कल्पना असली पाहिजे. आम्हाला शक्तिमान, स्वतंत्र, लोकसत्ताक भारत निर्माण करावयाचा आहे. या नव्यानें उभारणी झालेल्या भारतात प्रत्येक नागरिकाला प्रगतीची व सेवेची समान संधि मिळाली पाहिजे पैसा व प्रतिष्ठा यांतील विषमता नष्ट झाली पाहिजे आपली सारी शक्ति सृजनात्मक व सहकारी कार्याला लागावी नव्या लोकशाही भारतांत जातीयवाद, अलगपणा, अस्पृश्यता, अन्याय, विषमता, पिळवणूक यांना स्थान रहाणार नाही प्रत्येकास धर्मस्वातंत्र्य राहील. पण धर्माला राष्ट्राच्या राजकीय वा आर्थिक बाबतीत ढवळाढवळ करू दिली जाणार नाहीं"

अशा तऱ्हेचा समृद्ध, संपन्न भारत देश करण्यासाठीं जवाहर-लालजी अविरत कार्य करू लागले त्यांना वेळ अपुरा पडे त्यानीं निरनिराळ्या नालेवाईकाना, पाहुण्याना अनेक वेळां भेटीसाठीं बोला-वलें. पण पाहुण्याशीं निवांतपणें बोलायला चालायला वेळ होता कुठें जवाहरलालजींना? पाहुण्यांची एकच तक्रार असे, "जवाहर-लालजी आम्हांस अगत्यानें, आग्रहानें बोलावतात, पण आमच्याशीं चर्चा करायला, भेटीगाठी घ्यायला ,बोलायला त्यांना निवांत वेळच

नसतो मुळी! जातीजातींतील, राष्ट्राराष्ट्रांतील व नानाविध पंथ-प्रणालींतील संघर्ष, दुरावा नष्ट करण्याचें महान् कार्य जवाहरलालजींनीं मनापासून केलें!

हें कार्य करीत असतानाच जवाहरलालजींना अन् त्याच्या भारत-वर्षाला एका भयंकर संकटाशीं झुंज द्यावी लागली, आघाताशीं मुकाबला करावा लागला

हिंदी चिनी भाई भाई अशा पोकळ गर्जना करणाऱ्या,विश्वास-घातकी, कपटी लाल चीननें, पंचशील तत्त्वांची पायमल्ली करून, लोकशाहीनें विकासाची घोडदौड करणाऱ्या भारतभूमीवर आक्रमण केलें! सारी भारतीय जनता चिडली, पेटली चीनचें हें कृत्य नीच-पणाचें होतें आमच्या शांततेच्या तत्त्वाला त्यांनीं खीळ घातली, विकासात अडथळा आणला. पण जवाहरलालजींच्या कुशल नेतृत्वा-खालीं भारतीय जनता "हम एक है" हें तत्त्व अंगीं बाणवून, ऐक्याच्या भावनेनें 'एक' झाली अन् या जनतेनें चीन देशाला सण-सणीत उत्तर दिलें! चपराकच ठेवून दिली. सर्व भारतीय जनतेनें, आपल्या थोर नेत्याला अभूतपूर्व सहकार्य दिलें प्रत्येक बाबतींत मदत दिली आणीबाणीच्या, संकटाच्या वेळीं आम्ही आपापसांतील भेदा-भेद, भांडणें मिटवून एक होतों हे भारतीय जनतेनें साऱ्या विश्वाला दाखवून दिले साऱ्या जगांत चीनची नाचक्की झाली. भारतास, सर्व लोकशाहीवर निष्ठा ठेवणाऱ्या देशांनी हरेक प्रकारची मदत केली. चीनच्या प्रतिष्ठेचे मात्र सर्वत्र वाभाडे निघाले भारत देशांत दुफळी माजवून, साम्यवादी क्रांति घडवून आणू म्हणून हें आक्रमण चीननें केलें होतें पण तें त्याच्याच गळ्यात आलें! या आक्रमणाचा सर्व शक्तिनिशीं प्रतिकार करताना जवाहरलाल म्हणाले, "भारताला युद्ध नको! पण जेव्हा आमचे स्वातंत्र्य व शांतता धोक्यात आहे असें आम्हास वाटेल त्यावेळीं आम्ही स्वस्थ बसणार नाहीं." न्याय, स्वातंत्र्य व शांतता यांच्या स्थापनेकरिता, आमच्या मित्र राष्ट्राकडून

आम्ही वाटेल ती मदत घेऊ व अन्याय, अत्याचार आणि आक्रमण यांचा प्रतिकार करू."

"भारत आपणहून कोणावर आक्रमण करणार नाहीं. पण दुसऱ्याचें आक्रमण आमच्या देशावर झालें तर ते परतविल्याखेरीज राहणार नाहीं। आम्ही तटस्थ वा अलिप्त आहोंत याचा अर्थ कोणी आम्ही दुर्बळ आहोंत असा करून घेत असतील तर तो पूर्ण चुकीचा आहे आम्ही दुर्बळ नाहीं! आत्मसंरक्षणासाठीं वाटेल ती किंमत देऊन आम्ही लढू! "

भारत–चीन संघर्षांत तिसरें जागतिक महायुद्धहि पेटतें किंवा काय असं वाटू लागलें. पण पंडित जवाहरलालजींच्या कुशल नेतृत्वामुळें तें टळलें व चीनला माघार घ्यावी लागली. सर्व जगानें चीनचा निषेध केला! त्याची छी थू. केली. या आणीबाणीच्या काळात या महापुरुषाने आपलें कर्तव्य चोख बजावले व भारतीय जनतेस धैर्य दिलें. चीननें माघार घेतली तरी तो परत आक्रमण करणार नाहीं असे नाहीं कारण तो काळसर्प आहे पण जवाहरलालजींनी हें भारतराष्ट्र संरक्षणासाठीं सुसज्ज केले आहे। मानवतेच्या या उद्धारकावर, दीनदलितांच्या विमोचकावर, भारतभूमीच्या या महान् नेत्यावर खूपच जबाबदारी पडली अत्यंत धैर्यानें, धडाडीनें ही जबाबदारी त्यांनी पार पाडली पण या प्रचंड कार्यामुळें ते थकले . अशक्त होऊं लागले डॉक्टरांनीं विश्रांतीचा सल्ला दिला पण जवाहरलाल त्याचें थोडेंच ऐकतात? त्यांचे आपले राष्ट्रउभारणीचें कार्य सतत चालूच होते राष्ट्र त्यांना बलवान करावयाचें होते त्यांच्या सेवेंत खंड नव्हता. याचा अनिष्ट परिणाम जवाहरलालजींच्या प्रकृतीवर झाला अस्वस्थता वाढू लागली. तशांत जानेवारी १९६४ मध्यें भुवनेश्वर येथें कांग्रेस अधिवेशन भरलें पंडितजी तेथें पूर्वीच्याच उत्साहांत कार्य करीत होते, पण आपले वय झालें होतें हे विसरून ही उत्सवमूर्ति उत्साहानें कार्यक्रम पार पाडीत होती. अन् अचानक

पंडितजींना 'हृदयविकाराचा झटका' आला पुढील अनिष्ट काळाची ही चाहूल होती, यमराजानें आपलें आगमन वर्तविलें.. यमदूत अवनीवर उतरले होते व त्यांचे पाश या महान् नेत्याच्या अंगीं आवळले जात होते. .डॉक्टरांच्या त्वरित वैद्यकीय उपचारामुळे पंडितजी बरे झाले. पण त्यांचें अर्धांग मात्र पूर्वीसारखे काम करू देईना. पंडितजींना माघार माहित नव्हती ते तसेच काम रेटत होते अखेर तो अमोल दिन, दुर्दिन आला भारतालाच नव्हे तर सर्व विश्वाला शोकात टाकणारा तो अपवित्र दिन उगवला आज काही अघटित ऐकावयास मिळेल असं कुणालाच माहित नव्हतें पण काळ मात्र हसत होता, यमदूत आपले पाश पंडितजीभोवती आवळत होता.

२७ मे १९६४ ! हाच तो अशुभ दिन साऱ्या दुनियेला धक्का देणारा हाच तो दुर्दिन. सकाळीच जवाहरलालजींना हृदयविकाराचा झटका आला अन् त्यांची शुद्ध हरपली. अखेरपर्यंत ते बेशुद्धच होते. भारतरत्न जवाहरलालजींना वाचविण्यासाठी [illegible]तरी डॉक्टर्स, वैद्य खपत होते ! पण.. व्यर्थ. सर्व व्यर्थ !!

अखेर नियतीनें वेळ साधली. निर्घृण काळ हसला यमदूताचें काम फत्ते झाले होते. अवनीवरचा शांततेचा पुरस्कर्ता, महान् शांतिदूत पुन्हा शांतीच्या साम्राज्यात परतत होता पुनः परत न येण्यासाठीं ! त्याचें अवतारकार्य संपलें होतें कृतार्थ जीवनाची इतिश्री झाली होती !

भारताचा भाग्यविधाता, लोकशाहीचा, पुरस्कर्ता दीनाचा, त्राता, दुःखिताचा सांत्वयिता, भारतीय स्वातंत्र्याचा उद्गाता, दलितांचा आधार, नवभारताचा शिल्पकार, भारतीय अस्मितेचा देदीप्यमान आविष्कार, भारतीय नेतृत्वाचा जवाहर जवाहरलाल भारतभूमीला सोडून निघून गेला भारतीयांना अनाथ, पोरके करून निघून गेला. भारतरत्न जवाहर भारतीय मानवतेचें, नवभारताचे

... वाचनालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८२१...... दि ......
क्रमांक ...९२-३९...... नोंदणी दि ......



सुंदर प्रतीक होतें. भारतीय लोकशाहीचें स्फूर्तिस्थान होतें. भारतीय समाजवादाचे प्रणेते होते भारतीय संस्कृतीचें आश्रयस्थान होते. जवाहर प्रतिभासंपन्न ग्रंथकार होते कल्पक नि भावनाशील राज्यकर्ते व कणखर तत्त्वज्ञानी होते अनेक प्रचंड वादळांतून, तुफानांतून भारत देशाची नौका त्यांनी निभावून नेली ते उत्कृष्ट मानवक

भारतावर कोसळलेल्या अंतर्गत समस्यांची उकल जवाहरलालजींनीं केली देशाच्या रक्षणार्थ आपल्या कार्येचें कृपण केलें व अहोरात्र अक्षरशः चंदनाप्रमाणें झिजून त्यांनीं भारतमातेचा कीर्तिसुगंध जगभर पसरविला

काळानें भारतावर फार मोठा घाव घातला महान् भारताच्या महान नेत्याचें महानिर्वाण झालें ! भारताचा भाग्यसूर्य मावळला भारतामातेचा थोर, लाडका सुपुत्र, भारतभूमीचा, भारतीय जनतेचा निरोप घेऊन अनंताकडे मार्गस्थ झाला एका महान् युगपुरुषाची महान जीवनयात्रा समाप्त झाली

साऱ्या विश्वाला दुःखसागरांत लोटून हा शांतिदूत जवाहर देवाच्या दरबारीं निघून गेला सारी भारतीय जनता या दारुण आघातानें अनाथ बनली भांबावून गेली पण असं भांबावून घाबरून चालणार नाहीं आपल्या असहाय्य स्थितीचा फायदा घेण्यासाठी आजूबाजूला आपले शत्रु उभे ठाकले आहेत हें ध्यानात ठेविलें पाहिजे. आपण एकजुटीनें, ऐक्यभावानें पुढील सर्व संकटाशी सामना देऊं या. जवाहरलालजींनी हेंच आपल्याला शिकविलें आहे !

आपले प्रिय जवाहरलाल आपल्यात आज नाहीत अन् यापुढेंहि नाहींत ! पण त्याच्या चिरस्मरणीय स्मृतिघटना आपल्यापाशीं आहेत ना ! जवाहरलालजींनीं सांगितलेलीं महान् तत्वें आपणास माहीत आहेत त्यांच्या स्मृतींची, तत्त्वाची दिव्य ज्योत आपणास कायम मार्गदर्शक ठरेल ! त्या दिव्य ज्योतीच्या तेजस्वी प्रकाशात

आपण आपली भाग्योदयाची वाटचाल करू या! राष्ट्रउभारणीचें कार्य करू या! वचनाप्रमाणे, राष्ट्रसेवेसाठी झटणाऱ्या त्या थोर, सुपुत्रास, भारतीय जनतेच्या कंठमण्यास त्रिवार वंदन!! त्यांचा आदर्श समोर ठेवून आपण कार्यास सुरुवात करू! जय हिंद.



शांतिदूताचे महाप्रयाण....!

प्रकरण नववें

# विचारदर्शन



भारताच्या भाग्यविधात्या, लोकाग्रणी भारत-भूमीच्या थोर सुपुत्रानें, जनतेच्या प्राणाहून प्रिय असलेल्या जवाहरनें, आपल्या लिखाणातून, भाषणातून अनेक स्फूर्तिदायक, मार्गदर्शक, आदर्श विचार मांडले आहेत त्यांच्या

विचारसरणीनुसार, मार्गदर्शक तत्त्वानुसार आपण आपली वाटचाल केली पाहिजे लोकसत्ताक भारतास आपली सर्वांगीण प्रगती करावयाची आहे आणि ही प्रगती पंडितजींनीं दाखवून दिलेल्या मार्गानें गेल्यासच, होईल यात शंका नाही

पंडितजींनीं वेळोवेळीं जे विचार मांडले त्यापैकीं काहीं विचार पुढें दिले आहेत

★ तुम्ही जर नेहमी लहानसहान गोष्टींचा विचार करीत राहिलात आणि किरकोळ गोष्टींवरून रागावून भांडत बसलांत तर तुम्ही लहानच राहाल तुम्ही कधींच मोठे होणार नाहीं परंतु तुम्ही नेहमी व्यापक दृष्टिकोनांतून विचार केला आणि जीवनाच्या आव्हानास जोमानें आणि धडाडीनें तोंड दिलें तर तुम्हीं मोठे व्हाल भारताला जितका मोठेपणा प्राप्त होईल तितकाच तो तुम्हाला प्राप्त होईल केवळ स्वत पुरता विचार करून आपण मोठें होऊ असा स्वार्थी विचार तुमच्या मनात निर्माण झाला तर तुम्हीं केलेलें शिक्षण व्यर्थ आहे असें म्हणावें लागेल. म्हणून समृद्ध संपन्न भारत निर्माण करण्याचा या महान् कार्यांत तुम्ही पूर्णपणें सहभागीं व्हा, असे केल्यानें तुमचा स्वत चा विकास व्हावयास मदत होईल !

★ प्रेमाची किल्ली घेऊन मुलाच्या हृदयात शिरले पाहिजे आडदांड पक्ष्याला कोमल फुलातील मध चाखतां येणार नाहीं तें काम गू गू करणाऱ्या भुंग्यानाच साधेल नाचत नाचत येऊन हळूच बसणाऱ्या फुलपाखरानाच साधेल

बालके ही राष्ट्राची दौलत आहे ह्या दौलतीची काळजी घेणें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे

★ भारताच्या उद्यानांतील हीं मुले म्हणजे सुंदर सुंदर फुलेंच आहेत मुलांनीं भारताच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या लोकांची माहिती

करून घ्यावी कारण ती सर्व माणसे एकाच कुटुंबातील आहेत आपण सर्वांनी मिळून भारताचें नंदनवन बनविलें पाहिजे हीं मुले–त्या बागेंतील फुलें–पाहून मला अतिशय आनंद झाला आहे मुलांनीं शाळेंतील फक्त पुस्तकेंच वाचायची नाहींत तर त्यांनीं खेळावें, नाचावें, बागडावें व गावें

★ संस्कृति म्हणजे संयम, शांतता, व सहिष्णुता माणसाच्या वर्तनावरून त्याच्या संस्कृतीची पूर्ण जाणीव होतें केवळ त्याच्या बडबडीवरून नव्हे

★ भारताला युद्ध नको ! पण जेव्हा मानवाचे स्वातंत्र्य व शांतता धोक्यात आहे असें आम्हांस वाटेल त्यावेळीं आम्ही तटस्थ रहाणार नाहीं.

★ युद्धात पहिला बळी लोकशाहीचा पडतो भारताची लोकशाही अजून बाल्यावस्थेंत आहे म्हणून तर भारतानें शांततेसाठीं अविरत श्रम केलें पाहिजेत.

★ आपलें लाखों देशबांधव उपासमारीनें होरपळत असतांना त्यांच्याच चितेवर स्वत:ची पोळी भाजून घेणाऱ्या स्वार्थान्ध व्यापाऱ्यांना फाशीची शिक्षा दिली तरी अपुरीच पडेल !

★ आम्ही जव्हा आमच्या देशाचा शांततामय विकास करण्यांत मग्न झालो होतो त्यावेळीं चीननें आमच्यावर हल्ला केला आहे आतां आपल्याला चीनच्या आव्हानाला तोंड दिलें पाहिजे आणि आपण तें देऊहि. पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं, आम्हीं आमच्या विकास योजना सोडून दिल्या आहेत. आपल्याला आता दुहेरी बोजा उचलावयाचा आहे. एकीकडे चिनी धोक्याला तोंड द्यावयाचें आहे व दुसरीकडे देशाची आर्थिक उभारणीहि करावयाची आहे.

★ देशाचें स्वातन्त्र्य धोक्यांत आलें आहे अशा वेळीं लोकानी शक्य तितका अधिक त्याग करण्यास तयार असलें पाहिजे संरक्षणासाठीं लागणारा पैसा, मग तो कररूपानें असो की अन्य मार्गाने असो या वृत्तींतूनच आपण उभा केला पाहिजे शेतकी आणि उद्योगधंदे याच्या त्वरित विकासावर भर दिला पाहिजे युद्धे जरी युद्धभूमीवर लढलीं जात असलीं तरी युद्ध चालू ठेवण्याची मुळें ही शेतात आणि कारखान्यात असतात

★ शेती उत्पादनाचे कार्य हें युद्धकार्याचाहि एक भाग आहे

★ युद्ध केवळ रणांगणावर लढलें जाणार नाहीं. शेतांत, कारखान्यात, शाळा–कॉलेजांत तें लढवावे लागेल

★ प्रत्येक व्यक्तीनें स्वतःला आघाडावरील सैनिक समजून चाललें पाहिजे.

★




लोकाग्रणी जवाहर

प्रकरण दहावें

# भारतरत्न जवाहरलालजींचा जीवनपट

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | नोव्हेंबर | १८८९ | अलाहाबाद (प्रयाग) या पवित्र तीर्थक्षेत्रीं जन्म. |
| | मे | १९०५ | उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला प्रयाण. |
| | | १९१० | केंब्रिज या विश्वविख्यात विद्यापीठातून बी ए पदवी मिळविली |
| | | १९१२ | बॅरिस्टर ॲटलॉ पदवी मिळविली मातृभूमीस आगमन |
| | डिसेंबर | १९१२ | बांकीपूर कॉंग्रेस अधिवेशनास प्रतिनिधि म्हणून हजर |
| | | १९१४ | एम् ए. |
| | फेब्रुवारी | १९१६ | कमला कौल यांच्याशीं, वसंतपंचमीच्या सुमुहूर्तावर, दिल्ली येथें अत्यंत थाटात विवाह |
| १९ | नोव्हेंबर | १९१७ | इंदिरेचा जन्म |
| १ | ऑगस्ट | १९२० | लो टिळकांच्या अन्त्ययात्रेस गांधीजीं बरोबर हजर |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६७७९ वि: [illegible]
क्रमांक ९१-३८... नों दि: [illegible]



| | | | |
|---|---|---|---|
| | | १९२१ | पहिला तुरुंगवास ६ महिने शिक्षा- |
| | मे | १९२२ | दुसरा तुरुंगवास १ वर्ष ९ महिन्याची शिक्षा |
| | मे | १९२३ | 'नाभा' संस्थानांत प्रवेश केल्याबद्दल अटक. |
| | | १९२३ | अलाहाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष. |
| | | १९२४ | प्रयाग येथें सरकारी बंदीहुकूम मोडून त्रिवेणीत स्नान. अटक |
| | | १९२५ | हिमालयात भ्रमण |
| | | १९२६–२७ | शांतता परिषदेस (ब्रुसेल्स) प्रतिनिधि म्हणून हजर<br>सोव्हिएट रशियास भेट स्वातंत्र्यदिन सोहळ्यास हजर |
| | | १९२८ | सायमन कमिशनवर बहिष्कार. अलाहाबाद येथें लाठीमारात जखमी |
| २९ | डिसेंबर | १९२९ | लाहोर काँग्रेसचे अध्यक्ष. |
| | | १९३० | कायदेभंगाबद्दल तुरुंगवास<br>तुरुंगांत "कन्येला पत्रें" हा ग्रंथ लिहिला |
| ६ | फेब्रुवारी | १९३१ | पिताजी मोतीलाल यांचें निधन. |
| ४ | जानेवारी | १९३२ | राजद्रोहाचा आरोप व तुरुंगवास. शिक्षेच्या काळांत "जगाच्या इतिहासाची तोंडओळख" हा ग्रंथ लिहिला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १९३३ | सिलोन देशाचा दौरा. |
| | | १९३४ | अटक व तुरुंगवास. नैनीच्या तुरुंगात "आत्मवृत्त" पूर्ण केलें. |
| | | १९३५ | युरोपला प्रयाण. |
| २८ | फेब्रुवारी | १९३६ | पत्नीचा मृत्यू. |
| १२ | एप्रिल | १९३६ | लखनौ काँग्रेसचें अध्यक्ष. |
| २१ | डिसेंबर | १९३६ | फैजपूर काँग्रेसचें अध्यक्ष. |
| | | १९३७ | निवडणूक-प्रचारार्थ देशात झंझावाती दौरा. |
| | | १९३७ | ब्रह्मदेश, मलाया या देशांना भेट |
| १० | जानेवारी | १९३८ | माताजी स्वरूपराणी यांचें निधन |
| | | १९३९ | सिलोन, चीन देशात दौरा. युरोपातील विविध देशाना भेटी |
| | ऑक्टोबर | १९४० | वैयक्तिक सत्याग्रह – अटक व तुरुंगवास. |
| | | १९४२ | अहमदनगर किल्ल्यात स्थानबद्ध करण्यात आलें. याच तुरुंगवासात 'भारताचा शोध' हा ग्रंथ लिहिला. |
| १५ | जून | १९४५ | सुटका |
| १३ | डिसेंबर | १९४६ | राष्ट्रीय सरकारची स्थापना. हंगामी मंत्रीमंडळात परराष्ट्र मंत्री व उपपंतप्रधान. |
| १५ | ऑगस्ट | १९४७ | स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान. |

| | | |
|---|---|---|
| डिसेंबर | १९४८ | राष्ट्रकुल परिषदेसाठीं इग्लडला रवाना इग्लडमध्यें भव्य, थाटाचें स्वागत पॅरीस येथें राष्ट्रसंघात भाषण. |
| | १९४९ | अमेरिकेचा दौरा अमेरिकेंत जगी स्वागत. युनोला भेट व भाषण. |
| | १९५१ | कॉंग्रेसचे अध्यक्ष. |
| | १९५२ | कॉंग्रेसचे अध्यक्ष. |
| | १९५३ | कॉंग्रेसचे अध्यक्ष. |
| | १९५४ | चीन देशाचा दौरा |
| | १९५५ | बाडुग परिषदेस उपस्थित. |
| जून | १९५५ | रशिया व युरोप यांना भेट. |
| जुलै | १९५५ | राष्ट्रपतींकडून " भारतरत्न " पदवी |
| जून | १९५६ | युरोपांतील विविध देशांचा दौरा. 'ब्रियोनी' येथें टिटो–नास्सेरशीं मुलाखत अमेरिकेचा दौरा. युनोंत भाषण. |
| | १९५७ | तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान म्हणून निवड. |
| | १९५८–५९ | नेपाळ–भूतानला भेट. |
| | १९६० | पौर्वात्य देशांत दौरा. पुणें विद्यापीठाकडून सन्मान व व " डॉक्टरेट " पदवी. |

| | | |
|---|---|---|
| | १९६१ | पाकिस्तानला भेट |
| | | बेलग्रेड येथें भरलेल्या तटस्थ राष्ट्रांच्या धुरीच्या सभेस हजर. |
| | १९६२ | पतप्रधानपदीं चौथ्यांदा निवड. |
| जानेवारी | १९६४ | भुवनेश्वर कॉंग्रेस अधिवेशनास हजर तेथें अचानक प्रकृति बिघडली |
| २७ मे | १९६४ | शांतिदूत, भारतभाग्यविधाते जवाहरलालजी नेहरू याचें महाप्रयाण ! |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३६५५२ .. वि: आरि
क्रमांक ९२३८ नों दि ३०/८/६५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४४६५
ग्रंथ, शाखा
REFBK-0014475

# पद्माकर प्रकाशन

५३२ रविवार, पेठ, नासिक.

आजच्या या संक्रमणाच्या काळांत, आणीबाणीच्या काळांत, राष्ट्रीय ऐक्याची भावना दृढमूल व्हावी, वाढीस लागावी हें सर्वमान्य तत्त्व डोळ्यांसमोर ठेऊन, किशोरावस्थेंतील विद्यार्थी वाचकावर, उद्यांच्या, भविष्य काळांतील पिढीवर, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्कार करण्याच्या हेतूनें तद्वत् च त्यांच्या अंगीं असलेल्या सद्‌गुणांची जोपासना करण्यास्तव "पद्माकर प्रकाशन" ची स्थापना करण्यांत आली. या प्रकाशन संस्थेद्वारा—या विशाल, परमपवित्र मातृभूमींतील, भारतभूमींतील थोर, महान् स्फूर्तिदायक, तेजस्वी, आदर्श व्यक्तिरेखा किशोरांपुढें ठेवल्या जाणार आहेत; याखेरीज ज्ञानवृद्धी व मनोरंजन करणारी अन्य पुस्तकें देखील प्रकाशित होणार आहेतच

पंडितजींच्या प्रथम स्मृतीदिनी पद्माकर प्रकाशनाचें पहिलें प्रकाशन "भारतरत्न जवाहर" प्रकाशित होत आहे अन् यापुढें वरील ध्येयानुरूप पुढची वाटचाल करणार आहोत

रसिक वाचकहो, वरील उपक्रमास, आपल्या शुभेच्छा लाभाव्यात, सर्वांचें सतत सक्रीय सहकार्य मिळावें हीं एकमेव इच्छा

## आमचीं प्रकाशनें

(१) भारतरत्न जवाहर पद्‌माकर कृष्ण सावरकर

(२) पंतप्रधान लालबहादुर शास्त्री : पद्‌माकर कृष्ण सावरकर

(३) 'मालती माधव' (किशोरांसाठीं ३ अंकीं नाटक) पद्‌माकर कृष्ण सावरकर

# पद्माकर कृष्ण सावरकर

# यांची ग्रंथसंपदा

१ दोन महर्षि

( भाग्यवान शतायुषी भारतरत्न अण्णासाहेब कर्वे व विश्वकवि नोबल पारितोषिकाचे मानकरी रवीन्द्रनाथ टागोर यांचीं चरित्रें )

२ राष्ट्रपति डॉ राधाकृष्णन

३ भारतरत्न जवाहर

# आगामी प्रकाशनें

❀ भारताचे पंतप्रधान

नामदार लालबहाद्दूर शास्त्री

❀ मालतीमाधव (किशोरांसाठीं ३ अंकी नाटक)

❀ किशोर कथा

( किशोरासाठी लिहिलेल्या विपुल कथांचा संग्रह )